# सृजनरंग

अंक - ३

डिसेंबर २०२२



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष : सृजनरंग : अंक - ३

- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रेरणा** : **मा. रणजितसिंह देओल,** (भा.प्र.से.)
  मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- **मार्गदर्शक** : **मा. सूरज मांढरे,** (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **प्रकाशक** : **राजेश पाटील,** (भा.प्र.से.)
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादक** : **रमाकांत काठमोरे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **विकास गरड**
  प्राचार्य, (समन्वय विभाग)
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **मनिषा यादव**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती समन्वयक** : **सुवर्णा पवार**
  विषय सहायक, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **तज्ज्ञ समिती** : **डॉ. संदीप पवार** (वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी)
  **राणी पाटील** (अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर)
  **संदीप वाकचौरे** (विषय सहायक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अहमदनगर)
  **तरुबेन पोपट** (निवृत्त मुख्याध्यापिका, पुणे)
  **सुवर्णा देशपांडे** (माध्यमिक शिक्षिका, डे. ए. सो. चे न्यू इंग्लिश स्कूल, सातारा)
  **निवृत्ती आहेर** (मुख्याध्यापक, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय आदर्श शाळा भोयेगाव, जि. नाशिक)
- **मुखपृष्ठ रचना** : **नीताली हरगुडे** (कला शिक्षिका, सरिता विद्यालय, पुणे)
- **मलपृष्ठ रचना** : **विवेकानंद पाटील** (कलासाम्राज्यम्, पुणे)
- **प्रथम आवृत्ती** : डिसेंबर २०२२
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.




# सृजनरंग

## अंक - ३

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# प्रस्तावना

राज्य शासनाने शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी यापूर्वी वेगवेगळ्या स्वरूपात प्रयत्न केले आहेत. त्या प्रयत्नांना निश्चितपणे काही प्रमाणात यशही मिळत आहे. तथापि राज्य सरकारने शिक्षणाच्या गुणवत्तेच्या व प्रयोगशीलतेच्या दृष्टीने राज्यात आदर्श शाळा निर्माण करण्याची भूमिका घेतली आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे सुमारे ४८८ शाळांची आदर्श शाळा (Model School) म्हणून निवड करण्यात आली आहे.

आदर्श शाळा या भौतिक सुविधांबरोबरच गुणवत्तेच्या दृष्टीने देखील विशिष्ट उंचीवर असायला हव्यात. त्या दृष्टीने या शाळांमध्ये अधिक प्रयोगशीलता निर्माण करण्यासाठी दृष्टीने वेगवेगळ्या स्वरूपात प्रयत्न सुरू आहेत. या विविध उपक्रमांनी शाळांच्या गुणवत्ता उंचावण्यास निश्चित मदत झाली आहे. जे जे म्हणून चांगले आहे त्या सर्वांचे सार्वत्रिकीकरण होण्याच्या दृष्टीने शासन स्तरावरून सातत्याने प्रयत्न होत आहेत. त्या प्रयत्नांचाच हा एक भाग आहे.

या शाळांमध्ये सुरू असणारे विविध उपक्रम राज्यातील इतर शाळांपर्यंत पोहोचावेत, तसेच यांपासून प्रेरणा घेऊन नवनवीन उपक्रम आपल्या कल्पकतेने राबवून शालेय गुणवत्तेचा आलेख उंचावण्याच्या उद्देशाने 'सृजनरंग' या ई–अंकाची निर्मिती करण्यात येत आहे.

आपण सर्वजण जाणतो की, एकविसावे शतक हे गतिमान असून अनेकाविध क्षेत्रात सातत्याने बदल घडत आहेत. त्या अनुषंगाने सातत्याने समोर येणारी आव्हाने यशस्वीपणे पेलण्यास सक्षम होण्यासाठी, ज्ञान प्राप्त करून कौशल्ये अंगीकृत करणे आवश्यक आहे. एकविसाव्या शतकातील शिक्षण हे सर्जनशील, चिकित्सक विचार, सहयोग, सहकार्य आणि संप्रेषण/संवाद यावर भर देणारे आहे. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने प्रगती झाल्यामुळे घरबसल्या संसाधने उपलब्ध होत असणाऱ्या विद्यार्थ्यांना माहितीचा महासागर सहजगत्या उपलब्ध होत आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी परिणामकारक अध्ययन–अध्यापन पद्धती अवलंबविण्याची गरज आहे. शालेय अभ्यासक्रमातील विषयनिहाय विशिष्ट अथवा क्लिष्ट संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत अधिक सुलभतेने पोहोचविण्यासाठी शिक्षकांनी विविध तंत्रे व कौशल्ये आत्मसात करणे देखील आवश्यक आहे. यासाठी पूरक कौशल्यांचा समुच्चय शिक्षकांच्या अंगी असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच विविध आव्हाने यांचा सामना करण्यासाठी आपल्या ठायी आत्मविश्वास निर्माण करून जगणे सुकर करणे, ही सध्याची गरज आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० तसेच पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दृष्टिकोनातून आपल्या शाळांमध्ये अनेकविध उपक्रमांना प्रारंभ झालेला आहे. 'शाळा एक समूह' म्हणून शालेय स्तरावर विविध उपक्रम राबवित असताना अनेक आव्हानांना सकारात्मकतेने सामोरे जाऊन शालेय गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न केले जात आहेत. हे कार्य निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

गुणवत्तावाढीबरोबरच सुजाण नागरिकत्व जोपासण्यासाठी नावीन्यपूर्ण विचारधारा आणि उपक्रमांचा स्वीकार करून आपण सृजनशील दिशेने वाटचाल करूया. राज्यातील काही शाळांनी केलेल्या प्रयोगाची दखल या अंकात घेण्यात आली आहे. अशाच उपक्रमांवर आधारित 'सृजनरंग' या ई–अंकाचे आपण नक्कीच स्वागत कराल अशी खात्री आहे. या उपक्रमांमधून आपणाला प्रेरणा मिळेल आणि त्या प्रेरणेतून आपणही आपल्या शाळा अधिक गुणवत्तेच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी प्रयत्न कराल असा विश्वास वाटतो.

**राजेश पाटील** (भा.प्र.से.)
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका


◈ **अशी बदलली शाळा** १
जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, पारगाव जोगेश्वरी, ता. आष्टी, जि. बीड

◈ **लोकसहभागातून घडली शाळा** ६
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिवनकवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

◈ **सामूहिक जबाबदारीतून शाळेचा विकास** १०
जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बेरडीपार काचे, पं. स. तिरोडा, जि. गोंदिया

◈ **शिक्षण परिषद : यशस्वी अनुभवाची वाट** १५
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर

◈ **आदर्शाची चालता वाट** १७
आदर्श शाळा वायशेत, अलिबाग, जि. रायगड

◈ **आनंददायी शिक्षणाच्या नव्या वाटा** २१
कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, जि. प. केंद्रिय प्राथमिक शाळा, मानवत, जि. परभणी

◈ **प्रेरणेचे बळ देणारी माझी शाळा...** २५
जि. प. प्राथ. केंद्रशाळा, पेंबर, ता. कराड, जि. सातारा.

◈ **मनातील शाळा** ३४
जि. प. उच्च प्राथ. शाळा पचखेडी (गा.) पं. स. कुही, जि. नागपूर.

◈ **गाथा विकासाची** ३७
जि. प. उच्च प्राथ. शाळा चिचाळ, पं. स. पवनी, जि. भंडारा

◈ **'आदर्श' उपाधी खरी ठरविणारी यशस्वी वाटचाल** ४२
जि. प. आदर्श प्राथ. व माध्य. शाळा, नांदे, ता. मुळशी, जि. पुणे

# अशी बदलली शाळा

*२२ जून, २०१५ हा राज्याच्या शैक्षणिक इतिहासातील क्रांतिकारी दिवस. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाचा शासन निर्णय या दिवशी निघाला. हा निर्णय केवळ शासन निर्णय नव्हता, तर राज्यभरातील शिक्षकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणारा, शिक्षकांना सन्मान देणारा व प्रत्येक मूल शिकू शकते हा विश्वास प्रत्येक शिक्षकाला देणारा तो एक गुरुमंत्र होता. शिक्षकांच्या मनातील या विश्वासाची पूर्तता करण्यासाठी शाळा डिजिटल झाल्या आणि या शाळांनी विद्यार्थ्यांना नव्या युगाची दालने खुली करून दिली. आमची शाळासुद्धा शिक्षक, ग्रामस्थ आणि शासनाच्या एकत्रित प्रयत्नांतून घडत गेली आणि आज राज्यातील एक आदर्श मॉडेल स्कूल बनली आहे.*

एकविसाव्या शतकातील जगातील बदलांचा वेग प्रचंड मोठा आहे. जग बदलत असताना शाळासुद्धा बदलत आहेत; परंतु हा बदल केवळ भौतिक असून चालणार नाही, तर तो गुणात्मक असणे अत्याधिक महत्त्वाचे आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाने हा विचार आणखी ठळक केला. राज्याचे तत्कालीन शिक्षण सचिव मा. नंद कुमार यांनी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची आखणी केली. हा कार्यक्रम तयार करताना शिक्षकांना विचारात घेतले. १०० टक्के मुले शिकावीत यासाठी शिक्षकांना पूर्णपणे स्वातंत्र्य देणारा हा शासन निर्णय होता. हा निर्णय सर्वार्थाने शिक्षक व विद्यार्थी यांना शिकण्या-शिकविण्यासाठी मोकळे अवकाश देणारा होता. प्रत्येक मूल शिकावे यासाठी शिक्षकांनी नवनवीन तंत्रे आपल्या वर्गात वापरावीत यासाठी यामध्ये प्रोत्साहन दिले गेले.



साधारणत: सन २०१० नंतर राज्यभरात शिक्षकांनी संगणकाचा वापर अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सुरू केला होता, परंतु सुरुवातीला तो केवळ वर्ड, एक्सेल, पॉवर पॉइंट इतक्या पुरताच मर्यादित होता. या शाळादेखील अगदी बोटांवर मोजण्याइतक्याच होत्या. त्यातही अनेक शाळा या माध्यमिक होत्या. या शाळांमध्ये शासकीय योजनेतून संगणक मिळालेले होते; परंतु दुर्दैवाने अनेक ठिकाणी हे संगणक बंद अवस्थेत होते. त्यानंतर हळूहळू ही परिस्थिती बदलत गेली. राज्यभरात शिक्षक नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करीत होते. या शिक्षकांना खऱ्या अर्थाने राज्याचे शिक्षण सचिव नंद कुमार यांनी एकत्र आणले. फेब्रुवारी, २०१४ मध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथे राज्यातील

तंत्रस्नेही शिक्षकांची एक बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत राज्यभरात तंत्रज्ञानात नावीन्यपूर्ण प्रयोग करणाऱ्या शिक्षकांच्या प्रयोगांचे सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर शिक्षकांसाठी तंत्रस्नेही शिक्षक प्रशिक्षणाचे मोड्यूल तयार करण्यात आले. राज्यात लाखो तंत्रस्नेही शिक्षक तयार झाले.



माझी शाळा जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पारगाव, जोगेश्वरी ही ग्रामीण भागातील शाळा. पालकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत सामान्य. अनेक पालक ऊसतोड करण्यासाठी, तसेच वीटभट्टीवर किंवा इतर कामासाठी स्थलांतर करणारे. अशा स्थितीत मुलांची उपस्थिती वाढविणे व त्यांना शाळेत टिकवून ठेवणे यासाठी भरीव प्रयत्न करणे गरजेचे होते. त्यासाठी मी तंत्रज्ञानाची मदत घेण्याचे ठरविले. शाळा उच्च प्राथमिक असल्यामुळे खूप सुविधा नव्हत्या. शाळा डिजिटल करण्यासाठी सर्वप्रथम आम्ही पालकांच्या बैठकीचे आयोजन केले. या बैठकीत पालकांना तंत्रज्ञानाचे महत्त्व पटवून दिले. अगदी अल्पावधीत पालकांनी मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग जमा केला. सर्वप्रथम शाळेत संगणक व प्रोजेक्टर बसविण्यात आले. पाठ्यपुस्तकातील कविता मोठ्या पडद्यावर दिसू लागल्या. पाठातील चित्रे मोठ्या पडद्यावर बोलू लागली, अंतराळातील ग्रह, तारे वर्गात अवतरले. नवनवीन घटक मुलांना त्यांना आवडणाऱ्या कार्टून्सच्या मदतीने शिकायला मिळू लागले. याचा फायदा असा झाला की, विद्यार्थी शाळेत नियमित येऊ लागले. पडद्यावर काय पाहिले याबाबत चर्चा करू लागले, आज काय नवीन शिकायला मिळणार याची उत्सुकता घेऊनच शाळेत येऊ लागले.

मुलांच्या उपस्थितीचा प्रश्न बऱ्यापैकी सुटला होता. अडचण होती ती शाळेतील आदिवासी समाजातील मुलांची. या मुलांची बोलीभाषा वेगळी व शाळेतील भाषा वेगळी त्यामुळे त्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होत होता. यावर उपाय म्हणून मी या विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेला उत्तेजन द्यायचे ठरविले. यासाठी त्यांच्या बोलीभाषेतील कथा, कविता रेकॉर्ड केल्या. त्यासाठी शाळेत रेकॉर्डिंग स्टुडिओ



उभा केला. या मुलांच्या बोलीभाषेतील कथा, कविता त्यांना रेकॉर्डेड स्वरूपात ऐकायला मिळाल्या. त्यामुळे त्यांच्या मनातील न्यूनगंड कमी झाला व ही मुले नियमित शाळेत येऊ लागली. शाळेतील रेकॉर्डिंग स्टुडिओ ही एक अभिनव संकल्पना होती. केवळ ऑडिओच नव्हे, तर विद्यार्थ्यांचे व्हिडिओ तयार करण्यासाठी शाळेत व्हिडिओ रेकॉर्डिंग स्टुडिओसुद्धा तयार केला. त्यासाठी शाळेत एका खोलीत व्हिडिओ कॅमेरा बसवून व एक भिंत क्रोमा करून मुलांचे वाचन, अभिनय, नाट्यीकरण यांचे रेकॉर्डिंग केले जाऊ लागले व नंतर ते त्यांना प्रोजेक्टरच्या मोठ्या पडद्यावर दाखविले जाऊ लागले. स्वतःला मोठ्या पडद्यावर पाहून मुलांना होणारा आनंद अवर्णनीय होता. जी मुले नियमित अभ्यास करतील त्यांचा व्हिडिओ बनविला जाईल असे प्रलोभन कामी आले. मुले नियमित अभ्यास करू लागली.



तंत्रज्ञानात दिवसेंदिवस नवनवीन बदल होत होते. त्याचा अभ्यासात काय उपयोग करता येईल याबाबत मी सतत नवनवीन गोष्टींचा अभ्यास करीत होतो. त्यासाठी मी मोबाईलवर असलेले विविध ॲप्स वापरायला सुरुवात केली, परंतु अनेक पालकांकडे स्मार्ट फोन नव्हते. सर्व विद्यार्थ्यांना याचा फायदा कसा करून द्यावा यासाठी मी शालेय व्यवस्थापन समितीची व पालकांची मदत घेतली. ही समस्या पालकांपुढे मांडल्यानंतर, ज्या पालकांची आर्थिक परिस्थिती उत्तम होती अशा पालकांनी आर्थिक सहयोग दिला व सुमारे १ लाख रुपये जमा करून त्यातून शाळेसाठी टॅब खरेदी केले. या टॅबमध्ये विविध शैक्षणिक ॲप्स इन्स्टॉल करून विद्यार्थी त्यांच्या साहाय्याने शिकायला लागले. Animal 4D, Anatomy 4D अशा स्वरूपाच्या विविध ऑगमेंटेड रिॲलिटी तंत्रज्ञानाचा वापर करून मुले विविध घटक मनोरंजक पद्धतीने शिकू लागली. खरे सांगायचे तर संपूर्ण जगच या तंत्रज्ञानामुळे मुलांच्या बोटावर आले होते. या उपक्रमांना खऱ्या अर्थाने शासनाने एक व्यासपीठ मिळवून दिले होते.



शाळा समृद्ध व्हावी यासाठी शाळेतील शिक्षकांच्या साहाय्याने आम्ही पालकांसोबतच विविध सामाजिक संस्थांशी समाज सहभागासाठी संपर्क करीत होतो. यातून शाळेचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला. शाळेला सर्वांत मोठी अडचण होती विजेची. ग्रामीण भागातील शाळा असल्यामुळे

वीज पुरवठा सतत खंडित होत असे, त्यामुळे शाळेसाठी सोलर अत्यावश्यक होते. अशा वेळी सर फाऊंडेशन यांचे सहकार्य मिळाले. त्यांच्या सहकार्यामुळे सोलापूर येथील प्रिसिजन या कंपनीने सीएसआरमधून शाळेला अडीच लाख रुपयांचे ई-लर्निंग किट दिले. यामध्ये इंटरॲक्टिव्ह स्मार्टबोर्ड, प्रोजेक्टर, लॅपटॉप तसेच सोलर सिस्टीम व इन्व्हर्टर मिळाले आणि शाळा विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाली. वर्गातील पारंपरिक खडू, फळ्याची जागा इंटरॲक्टिव्ह स्मार्टबोर्डने घेतली. या नव्या तंत्रज्ञानाने मुले हरखून गेली. खडूऐवजी बोटांनी लिहायला लागली, आवडती चित्रे रंगवायला लागली, विविध शैक्षणिक गेम्स स्मार्टबोर्डवर सोडवू लागली. त्यामुळे मुलांची शाळेतील उपस्थितीदेखील १०० टक्के झाली. आमची मुले वेगवेगळ्या देशांतील शिक्षक, विद्यार्थी यांच्यासोबत व्हर्च्युअल ट्रीपच्या माध्यमातून संवाद साधायला लागली आणि आमच्या वर्गखोलीत संपूर्ण जग अवतरले.

आमच्या शाळेतील सर्वांत नावीन्यपूर्ण प्रयोग म्हणजे आमचा म्युझिकल स्टुडिओ. पाठ्यपुस्तकातील कविता, प्रार्थना, गीते यांचे उत्तम प्रकारे गायन करणारी मुले शाळेत होती. गरज होती त्यांना संगीताची



जोड देण्याची. त्यासाठी आम्ही लोकसहभागातून शाळेत कॅसिओ, ऑक्टोपॅड, ट्रिपल, ढोल, ढोलकी, खंजीर, ड्रम, कोंगो अशी विविध प्रकारांची वाद्ये आणली. हळूहळू ही वाद्ये मुले वाजवायला शिकली. पाठ्यपुस्तकातील कविता आता सुरमयी झाल्या आणि मुलांना कविता आवडायला लागल्या. मुले संगीताच्या तालावर गायला लागली आणि रेकॉर्ड करून पालकांना ऐकवायला लागली. त्यामुळे शाळेत अनेक संगीतातील हिरे सापडले. या नवोपक्रमाचे राज्यभर कौतुक झाले. लोक शाळेला भेट द्यायला येऊ लागले; परंतु दुर्दैवाची बाब म्हणजे या प्रयोगासाठी उपयुक्त ठरणारे शाळेतील हे साहित्य कोणीतरी चोरून नेले. या वेळची विशेष बाब म्हणजे तत्कालीन शिक्षणमंत्री मा. विनोद तावडे साहेबांनी स्वतः आष्टी पोलीस स्टेशनला फोन करून या चोरीचा कसून तपास करण्याबाबत निर्देश दिले. एका शाळेत घडलेल्या चोरीची दखल स्वतः शिक्षणमंत्री घेतात ही बाब खूप मोठी होती. त्यातून आम्हांला हुरूप आला. या वेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांचे सहकार्य मिळाले. माजी शिक्षण संचालक, मा. वसंत काळपांडे साहेबांच्या नेतृत्वाखाली त्यांनी संपूर्ण आर्थिक सहयोग देऊन हा स्टुडिओ पुन्हा पूर्वीपेक्षा उत्कृष्ट उभा केला. यात आवर्जून सांगायची बाब म्हणजे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण



परिषदेचे संचालक मा. दिनकर टेमकर साहेबांनी स्वतः आष्टी येथे येऊन स्वतः च्या खिशातून आम्हांला भरीव आर्थिक मदत केली.

गतवर्षी राज्य शासनाने राज्यातील ५०० शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याचा शासन निर्णय निर्गमित केला आणि या ५०० शाळांमध्ये आमच्या शाळेची निवड झाली. यातून आज शाळेत रोबोटिक्स सारखे नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू झाले आहेत. विद्यार्थी शाळेत रोबोट तयार करण्याचे प्रशिक्षण घेत आहेत, तसेच 3D प्रिंटर, ड्रोन यांसारख्या बाबी लीलया हाताळत आहेत. या सर्व प्रयत्नांना पालकांचीसुद्धा मोलाची साथ आहे.

आज आमची शाळा एक रोल मॉडेल डिजिटल शाळा आहे. मुलांच्या कल्पनांना वाव देण्यासाठी तंत्रज्ञानातील नानाविध प्रयोग आम्ही करीत आहोत. राज्यातील अनेक शिक्षक, अधिकारी व शिक्षणप्रेमी नागरिकांनी शाळेला भेटी दिल्या आहेत. आमच्या या सर्व यशामध्ये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाने दिलेली दिशा अत्यंत महत्त्वाची आहे. आज राज्यातील बहुतांश शाळा डिजिटल झाल्या आहेत. शिक्षक तंत्रस्नेही झाले आहेत आणि हीच एकविसाव्या शतकातील समर्थ भारत घडविण्याची नांदी आहे.


सोमनाथ वामन वाळके

(राज्य ICT पुरस्कार प्राप्त शिक्षक)

(राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक)

**जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पारगाव जोगेश्वरी,**

**ता. आष्टी, जि. बीड**

# लोकसहभागातून घडली शाळा

शालेय शिक्षण विभागाने पहिल्या टप्प्यात राज्यातील ३०० जिल्हा परिषदेच्या शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेतला. या शाळा निवडताना काही निकष ठरविण्यात आले. या सर्व निकषांवर, कसोटीवर खरे उतरण्याची क्षमता असणारी, कोल्हापूर जिल्हा परिषदेची शिरोळ तालुक्यातील विद्यामंदिर, शिवनकवाडी ही शाळा. ग्रामस्थांच्या सहकार्यातून उभी राहिलेली, प्रशासनाच्या उत्तम प्रशासनाची द्योतक असणारी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली विकास होत असणारी, शिक्षकांच्या अखंड प्रयत्नातून फुलणारी आणि ४५५ विद्यार्थ्यांच्या आवाजाने गजबजणारी आमची शाळा विद्यामंदिर शिवनकवाडी ही गौरव शाळा. अशा शाळेच्या विविधरंगी यशाचे सिंहावलोकन करण्याचा एक प्रयत्न या लेखातून करीत आहोत.

- **शाळेचा पट :**

  २३५ मुले + २२० मुली = एकूण ४५५

- **शाळेला प्राप्त झालेले पुरस्कार :**

  १) डॉक्टर जे. पी. नाईक 'माझी शाळा, समृद्ध शाळा' स्पर्धेअंतर्गत तालुक्यामध्ये वरिष्ठ गटामध्ये द्वितीय क्रमांक, शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर

  २) स्वच्छ शाळा, सुंदर शाळा, हिरवी शाळा पुरस्कार प्राप्त.



- **भौतिक सुविधा :**

  इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे वर्ग असणारी, सुमारे चार हेक्टर एवढ्या क्षेत्रात विस्तारलेली, स्वच्छ, हिरवा परिसर, निसर्गरम्य वातावरणात वसलेली शाळा.

- **वाढता लोकसहभाग :**

  लोकसहभागातून शाळेला ग्रंथालय व पेयजल सुविधा यांचे बांधकाम करून मिळाले आहे. यासाठी रु. १,५०,००० इतका खर्च आला आहे. रोटरी क्लब, इचलकरंजी यांचेमार्फत शाळेला शौचालय बांधून मिळाले आहे. यासाठी रु. ६,००,००० इतका खर्च आला आहे. ग्रामपंचायतीच्या सहकार्यातून शाळेच्या मैदानाचे सपाटीकरण करून घेतले आहे. यासाठी रु. १,७०,००० इतका खर्च आला आहे. गावकऱ्यांच्या सहकार्यातून रु. १,३७,००० खर्च करून शाळेच्या इमारतीची आकर्षकपणे रंगरंगोटी करण्यात आली आहे. निवृत्त मुख्याध्यापक श्री. संभाजी कदम सर यांनी शाळेला दूरदर्शन संच भेट दिला आहे.

- **क्रीडांगण :**

  शाळेसमोर भव्य क्रीडांगण असून क्रीडांगणाचे सपाटीकरण करून खेळांची मैदाने आखलेली आहेत. या मैदानावर खो–खो, कबड्डी, धावणे या खेळांचे नियमित सराव होतात. दर शनिवारी कवायत, व्यायामप्रकार सादर होतात. सूर्यनमस्काराचे प्रात्यक्षिक सादर होतानाचे मैदानावरील दृश्य विलोभनीय असते.









- **क्रीडा साहित्य :**

  विविध योजनेअंतर्गत शाळेला क्रीडा साहित्य प्राप्त झाले आहे. त्यामध्ये व्हॉलिबॉल, रिंग, उड्यांची दोरी, क्रिकेटचे साहित्य समाविष्ट आहे.

- **स्वतंत्र वर्गखोल्या :**

  प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र वर्गखोल्या असून त्या ई–लर्निंगसाठी सुसज्ज आहेत. वर्ग सजावट आकर्षकरीत्या केलेली आहे. भविष्यात आठवीचे वर्ग सुरू करण्यासाठी पुरेसा वाव या शाळेत आहे.

- **स्वतंत्र स्वच्छतागृहे :**

मुला–मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय आहे. विशेष गरजाधिष्ठीत मुलांसाठी कमोडची सोय आहे.

- **पिण्याच्या पाण्याची सोय :**

शाळेत पिण्याच्या पाण्याची विशेष सोय आहे. शाळेचे स्वतंत्र बोअरवेल आहे. प्रत्येक वर्गात पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी स्वतंत्र सोय आहे. हात धुण्यासाठी हँडवॉश स्टेशन उपलब्ध आहे.

- **अग्निशामक यंत्रणा :**

शाळेत अग्निशामक यंत्र उपलब्ध असून, त्याचे नियमितपणे रिफिलिंग केले जाते. त्याचप्रमाणे प्रात्यक्षिक घेतले जाते.

- **ग्रंथालय :**

विद्यार्थी स्वतः नियोजन व संचलन करीत असलेले सुसज्ज ग्रंथालय आहे. सर्व विद्यार्थी दिलेल्या नियोजनाप्रमाणे पुस्तकांची देवघेव करतात. पुस्तकांचे स्वतंत्र देवघेव रजिस्टर आहे. वाचलेल्या पुस्तकातील सारांश मुले लिहून ठेवतात.

- **संगणक कक्ष :**

स्वतंत्र संगणक कक्ष असून ७ संगणक व १ प्रोजेक्टर उपलब्ध असून वापरात आहे.

- **नावीन्यपूर्ण विज्ञान केंद्र :**

एम.पी.एस.पी. कडून नावीन्यपूर्ण विज्ञान केंद्र शाळेत प्राप्त असून मुले आनंदाने त्याचा वापर करतात.

- **विद्युतीकरण सुविधा :**

शाळेत विद्युतीकरण सुविधा उपलब्ध असून, सर्व वर्गखोल्यांमध्ये वीज जोडलेली आहे.

- **संरक्षक भिंत :**

शाळेला चारही बाजूंनी दगडी बांधकामात असलेली संरक्षक भिंत उपलब्ध असून त्यावर रंगरंगोटी केलेली आहे. दोन्ही बाजूंनी प्रवेशद्वार आहे.

या शाळेत आजूबाजूच्या गावातील विद्यार्थी प्रवेश घेतात. त्यांच्या येण्याजाण्यासाठी रस्ते आहेत. वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन इमारत व भौतिक सुविधांचा विस्तार करण्यासाठी पुरेसा वाव आहे.

- **शैक्षणिक गुणवत्ता :**

या शाळेतील शैक्षणिक वातावरण विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण अध्ययनासाठी अत्यंत पोषक आहे. पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन शिक्षक विविध उपक्रम, अध्ययनास पोषक कृती राबवीत असतात. प्रत्येक मूल शिकले पाहिजे या भूमिकेतून प्रयत्न करीत असतात.

- **वाचन विकास उपक्रम :**

वाचन, लेखन व गणन या मूलभूत संकल्पना विद्यार्थ्यांनी आत्मसात कराव्यात म्हणून विविध उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये वाचनदिन, दररोज वाचन, श्रुतलेखन, वाचलेल्या पुस्तकांची टिपणे काढणे

यांसारखे उपक्रम राबविले जातात. वाचनालयात कथा, कादंबरी याबरोबरच वैज्ञानिक गणितीय भाषेत भारतीय संविधान संदर्भग्रंथ यांसारखी पुस्तके उपलब्ध असून ग्रंथालय समृद्ध आहे.

- **वैविध्यपूर्ण उपक्रम :**

विद्यार्थ्यांच्या नवनिर्मितीला चालना देण्यासाठी विज्ञान जत्रा, गणित जत्रा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेतली जाते. निसर्गातील विविध वनस्पती यांचा अभ्यास व्हावा यासाठी क्षेत्रभेट, वनभोजन, पुष्पप्रदर्शन, वृक्ष लागवड व संवर्धन यांसारखे उपक्रम घेतले जातात. या शाळेत विद्यार्थ्यांना कृतियुक्त शिक्षणातून ज्ञानाची निर्मिती करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. सर्व सण, महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी आनंदाने व उत्साहाने साजरे केले जातात.

- **क्रीडा सांस्कृतिक स्पर्धा :**

शैक्षणिक ज्ञानाबरोबरच क्रीडा स्पर्धेत ही शाळेने उज्ज्वल यश संपादन केले आहे. जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये अनेक विद्यार्थी चमकले आहेत. सांस्कृतिक स्पर्धेत जिल्हास्तरावर मोठ्या गटात विभागांमध्ये सलग तीन वर्षे विजेतेपद पटकावले आहे.

- **स्पर्धा परीक्षा :**

दरवर्षी होणाऱ्या चौथी व सातवी प्रज्ञाशोध परीक्षेत विद्यार्थी जिल्हा यादीत निवडले गेले आहेत. शिक्षक शिष्यवृत्ती व प्रज्ञाशोध परीक्षा साठीचे जादा तास रविवार व सुट्टीच्या दिवसात देखील घेतात. सराव परीक्षा पुरेशा प्रमाणात घेतल्या जातात त्याचप्रमाणे गरजेनुसार वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते.

- **प्रशासकीय बाबी :**

या शाळेत काम करताना येथील शिक्षकवृंद तन, मन, धन लावून काम करतो. येथील शिक्षकांनी स्वतः वर्गणी काढून व श्रमदान करून शाळेची रंगरंगोटी करून घेतली आहे. शाळेचे कार्यालय सुसज्ज व सुशोभित केले आहे. या शाळेत काम करताना शिक्षक शिष्यवृत्ती व प्रज्ञाशोध परीक्षेसाठी जादा तास रविवार व सुट्टीच्या दिवसात देखील घेतात, त्यामुळे विद्यार्थी शनिवार व रविवारीदेखील आनंदाने शाळेत येतात. ही शाळेची प्रगती पाहून आसपासच्या गावातील व इंग्रजी माध्यमात शिकणारी मुलेही शाळेत प्रवेशित झाली आहेत. याचाच परिणाम म्हणून सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थी संख्येत सुमारे ८५ ने वाढ झाली आहे.

या सर्व भौतिक सुविधांचा व शाळेतील विविध उपक्रमांचा व्हिडिओ बनविला असून त्याची लिंक खाली देत आहोत.

(https://drive.google.com/file/d/1--XnC8oM1h9GknuX65i3-ZJUxM5Lti8R/view?usp=drivesdk)

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिवनकवाडी,**
**ता. शिरोळ, जि. कोल्हापूर**

◈◈◈

# सामूहिक जबाबदारीतून शाळेचा विकास

**प्रस्तावना :**




महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभाग यांचा महत्त्वाकांक्षी पथदर्शी प्रकल्प 'आदर्श शाळा विकसन' अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बेरडीपार काचे या शाळेची आदर्श शाळा म्हणून निवड करण्यात आली. त्याची सुरुवात २०२०-२१ या सत्रापासून करण्यात आलेली आहे.

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बेरडीपार काचे येथील आदर्श शाळेची सुरुवात इयत्ता पहिलीपासून करण्यात आलेली असून यावर्षी इयत्ता पहिलीची पटसंख्या ५१ इतकी आहे. कोरोना महामारीचा संसर्ग असतानासुद्धा येथील शिक्षकांनी शिक्षणात कोणत्याही प्रकारचा खंड पडू न देता ज्ञानार्जनाचे कार्य उत्तमपणे केले. त्या अनुषंगाने शाळेत राबविलेल्या उपक्रमांचा तपशील खालीलप्रमाणे मांडण्यात येत आहे.

- **वाढता लोकसहभाग :**

  आदर्श शाळा विकसनाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून गावामध्ये शाळेबाबत जनजागृती करण्यात आली. त्यात गावातील लोकांचा सहभाग घेऊन त्यांच्या सहभागातून वर्गातील भिंती बोलक्या करण्यात आल्या. वर्गातील भिंती आणि सृजन बालभारती पाठ्यपुस्तकातील पाठ्यांश हा जणू आरशातील प्रतिमेसारखे भिंतीवर डिजिटल फ्लेक्सच्या माध्यमातून प्रतिबिंबित होऊ लागले.

- **पटसंख्येत वाढ :**

  बोलक्या भिंती व प्रसन्न शालेय वातावरण निर्मितीमुळे गावातील व जवळच्या गावातील ग्रामस्थांची पावले शाळेकडे वळू लागली. नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना प्रवेश देण्यात आला. बघता बघता इयत्ता पहिलीची पटसंख्या ५१ वर पोहोचली. त्यात गेल्या वर्षीच्या तुलनेने लक्षणीय वाढ झाली होती. इतर इयत्तांमध्येसुद्धा विद्यार्थी पटसंख्येत प्रगती झाली. यावर्षी शाळेत इयत्ता पहिली ते सातवीचे एकूण २६६ विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत.

- **पूर्वप्राथमिक वर्ग (अंगणवाडी) ची सहभागिता :**

शाळेच्या प्रांगणात गावातील एक अंगणवाडी केंद्र असून आदर्श शाळा विकसनासाठी अंगणवाडीचे सहकार्य व सहभाग आवश्यक आहे, हे अंगणवाडी कार्यकर्त्या ताई व मदतनीस यांना समजावून सांगण्यात आले. अंगणवाडीतील बालकांचे मूलभूत संबोध कौशल्य श्रवण, भाषण, संभाषण इत्यादी विकसनासाठी विविध मनोरंजक छोट्या कृती, खेळ व उपक्रम इत्यादींचे नियोजन करून देण्यात आले.

- **आकर्षक शालेय इमारत :**



शाळेच्या संपूर्ण इमारतीमध्ये १० खोल्या असून त्यापैकी ७ खोल्या वर्ग अध्यापनासाठी वापरल्या जातात. प्रत्येक वर्गखोलीचा बाह्यभाग विविध रंगीत चित्रांनी व मजकुरांनी सजविला आहे. तसेच वर्गाच्या आतील भागात त्या त्या वर्गाला अनुसरून आकर्षक बनविलेले आहेत. बाह्यभाग हा सुंदर सजविला असल्याने शालेय इमारत आकर्षक व बोलकी वाटते

- **विद्यार्थ्यांनुसार वर्गखोल्या :**

प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र वर्गखोली असून प्रत्येक वर्गखोलीची बैठक व्यवस्था सर्वांगसुंदर पद्धतीने करण्यात आलेली आहे. ज्या वर्गांची पटसंख्या जास्त आहे त्या वर्गांची बैठकव्यवस्था गट पद्धतीने व कमी पटसंख्या असलेल्या वर्गाची बैठकव्यवस्था संसदीय बैठक पद्धतीने करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याकडे शिक्षक वैयक्तिक लक्ष केंद्रित करू शकतात. सर्व वर्गखोल्या सुव्यवस्थित व चांगल्या स्थितीत आहेत.

- **स्वच्छतागृहांची उपलब्धता :**

शाळेत ज्ञानार्जन करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १३५ मुले व १३१ मुली आहेत. त्यांच्यासाठी प्रत्येकी २-२ अशी एकूण ४ स्वतंत्र स्वच्छतागृहे सुस्थितीत उपलब्ध आहेत. सदर स्वच्छतागृहांमध्ये मुबलक पाण्याची व्यवस्था असून स्वच्छ आहेत. शाळेत उपलब्ध स्वच्छतागृहांच्या निर्मितीसाठी अदानी फाउंडेशनने मोलाचे सहकार्य दिलेले आहे. विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृह प्रस्तावित आहे.

- **पेयजल सुविधा व हँडवाश स्टेशन :**

शाळेत पेयजल व इतर कार्यासाठी मुबलक पाण्याचा पुरवठा करणारे स्रोत उपलब्ध आहेत. पिण्याचे पाणी ग्रामपंचायतीमार्फत पुरविण्यात आलेल्या नळाद्वारे शाळेच्या पाण्याच्या टाकीत साठविले जाते. शाळेत ग्रामपंचायत व अदानी फाउंडेशनच्या सहकार्याने जलशुद्धीकरण यंत्र बसविले आहे व त्याद्वारे विद्यार्थ्यांना शुद्ध पेयजलाचा पुरवठा केला जातो.

- **स्वयंपाकगृह व भांडार कक्ष :**

शाळेत स्वतंत्र स्वयंपाकगृह बांधण्यात आलेले आहे व ती इमारत सुस्थितीत असून विद्यार्थांना देण्यात येणारे मध्यान्ह भोजनाचे मेन्यू कार्ड, देण्यात येणारी कडधान्ये यांची माहिती, सदर यंत्रणेशी संबंधित अधिकाऱ्यांचे नाव व संपर्क क्रमांक लावण्यात आलेले आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने अग्निशमन यंत्र बसविण्यात आलेले आहे. अन्नधान्य साठविण्यासाठी शाळेत स्वतंत्र धान्यकोठी उपलब्ध आहे.

- **शैक्षणिक साहित्य :**

विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी व संबोध स्पष्टीकरणासाठी शासनाद्वारे उपलब्ध झालेले व शिक्षक निर्मित शैक्षणिक साहित्याचा वापर करण्यात येतो. वर्गामध्ये विषयनिहाय शैक्षणिक कोपरे तयार करून दैनंदिन अध्ययन–अध्यापनात त्यांचा पुरेपूर वापर करण्यात येतो.

- **खेळाचे साहित्य :**

शाळेला विस्तीर्ण असे पटांगण असून तेथे विद्यार्थ्यांना प्रत्येक खेळ खेळण्याची संधी दिली जाते. विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार खेळाचे साहित्य शाळेत उपलब्ध आहे. त्याचा वेळोवेळी वापर केला जातो.

- **ग्रंथालय/वाचनालय/बालविज्ञान भवन :**

मुलांमध्ये वाचनाची आवड विकसित करण्याच्या दृष्टीने शाळेत ग्रंथालयाची निर्मिती करण्यात आली. त्यात वेळोवेळी नवीन पुस्तकांची भर पडली जाते. आज ग्रंथालयात जवळपास ३०५ पुस्तके उपलब्ध असून विद्यार्थी ग्रंथालयाचा लाभ घेतात. त्याच प्रकारे शाळेत शासनामार्फत नावीन्यपूर्ण बालविज्ञान केंद्र निर्माण करण्यात आले आहे. हे विज्ञान केंद्र अमूर्त संकल्पना मूर्त करण्यासाठी उपयुक्त ठरले आहे.

- **संगणक कक्ष :**

शाळेत एकूण ७ संगणक संच उपलब्ध असून, त्यापैकी २ संगणक संच सुस्थितीत आहेत. त्यांचा वापर शालेय कामकाजासाठी व विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्यासाठी केला जातो.

- **Virtual Classroom ची सुविधा :**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अध्ययन–अध्यापन प्रक्रियेसाठी एक माध्यम म्हणून Virtual Classroom ची संकल्पना अँड्रॉइड मोबाइल व स्मार्ट टीव्हीच्या मदतीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले गेले. प्रत्येक इयत्तानिहाय व्हॉट्सअॅप ग्रूप, फेसबुक, यू–ट्यूब, झूम अॅप व गुगल यांवर ऑनलाइन क्लास इत्यादींच्या आधारे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यात येतात.

- **शालेय विद्युतीकरण सुविधा :**

शाळेत अखंडित विद्युत सुविधा असून सर्व वर्गखोल्या व इतर खोल्यांमध्ये विद्युतीकरण केले आहे. सर्व खोल्यांमध्ये आवश्यक विद्युत उपकरणे (पंखा, लाईट, टीव्ही) सुसज्ज व निर्धोक स्थितीत आहेत.

- **शाळेची संरक्षक भिंत :**

  शाळेच्या सुरक्षेसाठी चारही बाजूने सुंदर व मजबूत बांधकाम असलेली संरक्षक भिंत बांधण्यात आलेली असून त्यावर स्टीलची जाळी बसविण्यात आलेली आहे. शाळेचे प्रवेशद्वार आकर्षक करण्यात आले आहे.




- **आपत्ती व्यवस्थापन :**

  आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने Fire Extinguisher अद्ययावत आहे. एका वर्गखोलीचे बांधकाम Emergency Exit नुसार करण्यात आले असून अदानी फाउंडेशन तर्फे यासाठी सहकार्य मिळाले.

- **वाहतूक व्यवस्था :**

  शाळेत गावातील व जवळच्या गावातील विद्यार्थी स्वतः पायी चालत येतात. त्यामुळे शाळेला स्वतंत्र वाहतूक व्यवस्था नाही.

- **शिक्षकांचे उत्कृष्ट प्रशिक्षण :**

  शाळेतील शिक्षक हे नवनवीन शैक्षणिक बाबींचे ज्ञान वृद्धिंगत होण्यासाठी केंद्र, तालुका, जिल्हा स्तरावर वेळोवेळी प्रशिक्षण घेत असतात. या व्यतिरिक्त देशांतर्गत व देशाबाहेरील प्रशिक्षण कार्यक्रमासाठी संधी प्राप्त झाल्यास त्याचा पुरेपूर उपयोग करण्यास शिक्षक सज्ज आहेत.

- **शिष्यवृत्ती परीक्षा तयारी :**

  विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा निर्माण व्हावी यादृष्टीने इयत्ता पाचवीमध्ये शिकणाऱ्या ३० विद्यार्थ्यांपैकी २० विद्यार्थी स्वयंप्रेरणेने तयार झाले असून, त्यांचा शिष्यवृत्तीचा नियमित सराव वर्ग अध्यापनाव्यतिरिक्त घेण्यात येतो. तसेच त्यांचे मूल्यमापन चाचणी परीक्षेद्वारे तपासले जाते. गेल्या वर्षी शिष्यवृत्ती परीक्षेत ३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते.

**नावीन्यपूर्ण उपक्रम – समजपूर्वक श्रवण, भाषण, संभाषण :**

इयत्ता पहिलीला गटा–गटातून अध्यापन करीत असताना असे जाणवले की, काही विद्यार्थी सांगितलेली कृती लवकर समजून घेतात, तर काही विद्यार्थी कृती पूर्णपणे समजून न घेतल्यामुळे व्यवस्थित कृती करीत नाहीत. ही बाब लक्षात आल्यानंतर अशा विद्यार्थ्यांचा वेगळा गट तयार करून त्याची श्रवण क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने एका शब्दाचे वारंवार उच्चार करून, त्यांची श्रवण क्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला.

त्याला यश येऊन त्यांच्या श्रवण क्षमतेत हळूहळू वाढ होऊन ते विद्यार्थी योग्य प्रकारे कृती करू लागले व नंतर भाषण क्षमतेचा विकास करण्याच्या हेतूने विद्यार्थ्यांशी अनौपचारिक गप्पा, गोष्टी, परिसरीय घटना, छंद इत्यादींबाबत चर्चा करण्यात आल्या व त्यांच्या मनातील विचारांना प्रकट होण्याची संधी दिली. विद्यार्थी–विद्यार्थी, विद्यार्थी–पालक, विद्यार्थी–शिक्षक, विद्यार्थी–समाज या घटकांमध्ये होणारी संभाषणे लक्षात घेऊन त्यामध्ये करावयाचे योग्य बदल संभाषणाद्वारे करण्यात आले. वरील सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये समजपूर्वक श्रवण, भाषण, संभाषण क्षमतेत आमूलाग्र बदल घडून आला.

**समस्या व त्यांचे निराकरण – नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांबाबत समस्या :**

सत्र २०२१–२२ मध्ये इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी माध्यमातून आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक असून त्या विद्यार्थ्यांना मराठी विषयात आवड नसल्याचे दिसून आले. पालकांचीसुद्धा अशीच भूमिका होती. त्यातच सृजन बालभारती पाठ्यपुस्तक त्यांच्या हाती दिले व त्यांच्या मनातील संभ्रम निर्माण झाला. पालकांनी याबाबत शाळेत विचारणा केली आणि इंग्रजी विषयावर मराठी विषयापेक्षा अधिक भर देण्याची विनंती केली. परंतु त्यांना सृजन बालभारती पाठ्यपुस्तकाचे महत्त्व समजावून देऊन त्यात इंग्रजी विषयसुद्धा आकर्षक व परिणामकारकरीत्या समाविष्ट असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. सृजनबालभारती पाठ्यपुस्तकाची उद्दिष्टे व वैशिष्ट्ये पालकांसमोर मांडण्यात आली. सृजनबालभारती पाठ्यपुस्तक अंतर्गत गणित विषय संपूर्ण देवनागरी लिपीमध्ये असल्याने विद्यार्थ्यांना अडचणी येतात व गणित विषयाचे आशय इंग्रजी माध्यमात व आकडेमोड आंतराष्ट्रीय लिपीत असावी असे वरिष्ठांना कळवावे असे पालकांनी सुचविले. त्यावर सृजन बालभारती पाठ्यपुस्तकातील गणित विषय देवनागरी व आंतराष्ट्रीय दोन्ही लिपीमध्ये शिकवून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पाडण्यात आली.

**संदेश :**

'सृजनरंग' या ई–अंकाच्या माध्यमातून आपले मत व्यक्त करीत आहोत की, माझी शाळा एका सामूहिक जबाबदारीने काम करीत असून, शाळेचा प्रत्येक घटक यामध्ये कसोशीने भाग घेत आहे.शाळेचा विकास हेच सर्वांचे ध्येय आहे. आदर्श शाळेप्रमाणे राज्यातील इतर सर्व शाळांत सदर कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी जेणेकरून राज्यातील सर्व विद्यार्थी याचा लाभ घेतील. ही अपेक्षा ठेवून लेखनास विराम देत शाळेबाबत तयार केलेली चित्रफीत youtube link - https://youtu.be/-nV4uTIV8NM सादर करीत आहोत. धन्यवाद !

**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बेरडीपार काचे,**

**पं. स. तिरोडा, जि. प. गोंदिया**

◈◈◈

# शिक्षण परिषद : यशस्वी अनुभवाची वाट




दिनांक ५ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्था, महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय शिक्षण मंडळ KGBV, शासकीय विद्यानिकेतन व नागरी भागातील शाळा यांचा समावेश करून राज्यात सुमारे ४८८ शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. यापैकी कोल्हापूर जिल्ह्यात १२ आदर्श शाळा आहेत. मागील वर्षी या शाळांमध्ये 'एकात्मिक पाठ्यपुस्तक' पथदर्शी प्रकल्प अंतर्गत सृजन बालभारती भाग एक, दोन, तीन व चारची अंमलबजावणी करण्यात आली.

**आदर्श शाळा–भौतिक सुविधा पडताळणी भेट प्रपत्र :**

या अनुषंगाने वर्षभर प्राचार्य, वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, साधन–व्यक्ती यांनी या आदर्श शाळांना भेटी दिल्या. या भेटीकरिता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने आदर्श शाळा–भौतिक सुविधा पडताळणी भेट प्रपत्र विकसित केले. आदर्श शाळांमध्ये ५ मार्च, २०२१ च्या शासन निर्णयानुसार उपलब्ध असलेल्या पुढील सुविधांची पाहणी करण्यात आली. (१) वाढता लोकसहभाग, (२) भविष्यात वाढती पटसंख्या व किमान १००–२५० पटसंख्या, (३) शालेय प्रांगणात अंगणवाडी (पूर्वप्राथमिक वर्ग), (४) आकर्षक शाळा इमारत, (५) विद्यार्थी संख्येनुसार वर्गखोल्या, (६) मुलांकरिता व CWSN साठी स्वतंत्र व पुरेशी स्वच्छतागृहे, (७) पेयजल सुविधा व हँडवॉश स्टेशन, (८) मध्यान्ह भोजनाकरिता स्वयंपाक गृह/धान्यकोठी, (९) शैक्षणिक साहित्य, (१०) खेळाचे साहित्य, (११) ग्रंथालय/वाचनालय, (१२) संगणक कक्ष, (१३) व्हर्चुअल क्लासरूमची सुविधा, (१४) शाळेत विद्युतीकरण सुविधा, (१५) शाळेला संरक्षक भिंत, (१६) आपत्ती व्यवस्थापन, (१७) परिसरातील शाळेमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वाहतूक व्यवस्था, (१८) उत्कृष्ट शिक्षकांना देशांतर्गत देशाबाहेर प्रशिक्षणासाठी पाठविणे, (१९) इयत्ता पाचवी स्कॉलरशिप परीक्षेची तयारी करून घेणे. या मुद्द्यांनुसार शाळाभेटी व मार्गदर्शन करण्यात आले.

**आदर्श शाळांची अध्ययनस्तर निश्चिती :**

२५ एप्रिल, २०२२ ते २७ एप्रिल, २०२२ या कालावधीत २१८ बाह्य स्तर निर्धारक यांच्या मदतीने मध्ये १२ आदर्श शाळांमधील ४४७५ विद्यार्थ्यांची अध्ययनस्तर निश्चिती देखील करण्यात आली. यात भाषा विषयात अचूक वाचन करणारे ३,६७२ (८२%), अडखळत वाचणारे ६६० (१४.७५%) व वाचन न येणारे

१४३ (३.२०%) तसेच लेखनात अचूक लेखन करणारे ३,३७३ (७५%),जोडाक्षराशिवाय लेखन करणारे ८८५ (१९.७८%) व लेखन न येणारे २१७ (४.८५%) याची पडताळणी करण्यात आली. गणित विषयात भागाकार २,२९१ (७३.७८%), गुणाकार ४१६ (१३.४०%), वजाबाकी, १,२७७ (२८.५४%), बेरीज २६० (५.८१%), संख्याज्ञान १२३ (२.७५%) व प्रारंभिक स्तर १०८ (२.४१%) अशी स्थिती दिसून आली.

**आदर्श शाळा शिक्षण परिषद :**

शैक्षणिक वर्ष २०२२–२३ या कालावधीत दि. ८ जुलै, २०२२ रोजी शिवाजी विद्यापीठ शिक्षणशास्त्र विभाग, कोल्हापूर या ठिकाणी आदर्श शाळा शिक्षण परिषद घेण्यात आली. या परिषदेस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर मा. संजय सिंह चव्हाण, विभागीय उपसंचालक कोल्हापूर विभाग, कोल्हापूर मा. महेश चोथे हे उपस्थित होते. निमित्त होते ते एकाच व्यासपीठावर १२ आदर्श शाळांतील मुख्याध्यापक व शिक्षकांना एकत्रित आणण्याचे. तसेच आदर्श शाळेतील शिक्षकांना अध्यापनशास्त्र याविषयी मार्गदर्शन करणे, आदर्श शाळांमध्ये श्री अरबिंदो सोसायटीमार्फत प्रास्तावित रूपांतर कार्यक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी मार्गदर्शन करणे. शांतीलाल मुथा फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचे मार्गदर्शन करणे आणि आदर्श शाळांमधील अध्ययनस्तर निश्चितीचे शाळानिहाय विश्लेषण करणे.



त्यानुसार या शिक्षण परिषदेत अध्यापनशास्त्र (Pedagogy) भाग–१ व अध्यापनशास्त्र भाग–२ या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. वर्गात अध्यापन करीत असताना वैविध्य कसे आणावे? 4C यात Creativity, Construction, Communication व Collaboration यांचा वापर कसा करावा तसेच Problem Solving यावर चर्चा करून काही प्रत्यक्ष कृती घेण्यात आल्या. चालू शैक्षणिक वर्षात अरविंद घोष व शांतीलाल मुथा यांचे नियोजित कार्यक्रम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. अध्ययनस्तर निश्चिती यावर शाळानिहाय विश्लेषण व चर्चा करण्यात आली. आदर्श शाळा भेटी निरीक्षण अहवालाचे सादरीकरण करण्यात आले.

आदर्श शाळांमधील प्रत्येक मूल शिकते करण्यासाठी, कोरोना काळात झालेला लर्निंग लॉस टाळण्यासाठी व लर्निंग गॅप भरून काढण्यासाठी भाषा पेटी, गणित पेटीचा जास्तीत जास्त वापर करणे, अभ्यासात मागे असणाऱ्या मुलांसाठी अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करणे जे जे चांगले देता येईल ते ते देण्यासाठी टीमवर्कची आवश्यकता असल्याची जाणीव करून देण्यात आली आणि शिक्षण परिषदेची सांगता करण्यात आली.

**डॉ. अंजली सतीश रसाळ, वरिष्ठ अधिव्याख्याता,**
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर**

# आदर्शांची चालता वाट

संस्कारांच्या अनेक व्याख्या करता येतील, परंतु संस्कार म्हणजे दिले जाणारे ज्ञान किंवा सुधारल्या जाणाऱ्या चुका अशी साधारण व्याख्या आपण सहज करू शकतो. संस्कार सामान्यपणे शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक, सामाजिक या स्रोतांद्वारे होत असतात. ते चांगले किंवा वाईट असू शकतात. प्रथम संस्कार आईच्या गर्भामध्ये सहाव्या महिन्यांपासून अर्भकावर व्हायला लागतात. त्यामुळे तुकाराम महाराज म्हणतात, ''शुद्ध बीजा पोटी, फळे रसाळ गोमटी'' मराठीत म्हणसुद्धा आहे, 'बाप तसा बेटा कुंभार तसा लोटा', 'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात.' मुलांवर बारा वर्षांपर्यंत होणारे संस्कारच त्यांचे भवितव्य सांगतात. मुलांवर संस्कार कसे करावे? तर पालकांसाठी कानमंत्र–कोणतीच व्यक्ती वाईट नसते. तिच्यावर झालेले संस्कार वाईट असतात. मूल आपले लवकर ऐकत नसेल, तर ते आपले अनुकरण करीत असते. पालकच जर टीव्ही आणि मोबाइल गेम खेळत असतील, तर मुले कशी अभ्यास करतील. तुम्ही घरात कसे वागता, बोलता, व्यक्त होता त्यानुसार प्रथम संस्कार मुलांवर होत असतात.



संस्कार म्हणजे गुणांचा गुणाकार आणि दोषांचा भागाकार. गुणांचा गुणाकार याचा अर्थ स्वतःमधील गुण वाढवायचे आणि दोषांचा भागाकार याचा अर्थ स्वतःमधील दोष अल्प म्हणजे कमी करायचे. त्याकरिता मुलांचे छंद जोपासायला हवेत. त्यांच्या कमतरता त्यांना भासू न देता कलागुणांना वाव द्यायला हवा. मुलांना समजून सांगायला हवे.

मुलांनी मागितलेल्या गोष्टींना लगेच होकार किंवा नकार देऊ नका. त्यावर विचार करा. योग्य असेल तर होकार द्या, नसेल तर त्यांना समजून सांगा. घरात घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक निर्णयामध्ये त्यांना सहभागी करा. त्यामुळे त्यांना व्यावहारिक, सामाजिक ज्ञान होईल. यशस्वी झालेल्या लोकांची घरात चर्चा करा. चालू घडामोडी, विषय–विचार यावर चर्चा करा. मुलांचे निर्णय त्यांना स्वतः घेऊ द्या. सुरुवातीला एवढे चांगले संस्कार द्या की, ते योग्यच निर्णय घेतील. मनन करून, सर्वांगीण विचार करून कृती करतो तो मानव. विचार व कृती चांगल्या होण्यासाठी संस्कारांची गरज असते. भारतीय शास्त्राप्रमाणे प्रत्येक कृतीच संस्कारयुक्त असली पाहिजे. प्रत्येक कार्यच चांगले संस्कारयुक्त असावयास पाहिजे. उदाहरणार्थ, केळे खाऊन आपण साल टाकतो ही कृती आहे. केळे खाऊन साल कचऱ्याच्या टोपलीत टाकतो ही प्रकृती. केळे खाऊन साल रस्त्यावर टाकतो ही विकृती. दुसऱ्याने रस्त्यावर टाकलेली साल कचऱ्याच्या डब्यात टाकणे ही संस्कृती.

संस्काराची आणखी एक व्याख्या करता येईल, ती म्हणजे चांगल्या सवयी लावणे व वाईट सवयी काढून टाकणे. मुलांवर चांगले संस्कार करायचे म्हणजे त्याला आई-वडिलांना रोज नमस्कार कर, दुसऱ्याची निंदा करू नको इत्यादी शिकवायचे. पण ते कसे शिकवायचे? तत्त्वज्ञान सांगून नाही, गोष्टी सांगून नाही, चॉकलेट, आईस्क्रीमची लाच देऊन नाही, तर आपल्या कृतीने आठ वर्षांच्या मुलांना रोज मोठ्या मंडळींना नमस्कार करायची आज्ञा दिली, तर चार दिवस करतील पाचव्या दिवशी सांगतील मी नाही करणार. त्याला नमस्कार करण्याच्या फायद्याबद्दल तत्त्वज्ञान सांगितले तरी उपयोग होणार नाही. तुम्हांला जर वाटत असेल की, तुमच्या मुलाने मोठ्या मंडळींना नमस्कार करावा, तर एकच उपाय आहे आजपासून तुम्ही घरातील सर्व वडीलधाऱ्यांना रोज फक्त एकदाच नमस्कार करा. मुलाला एकदा पण नमस्कार करावयास सांगू नका. चार दिवसांच्या आत मुलगा तुमच्या पाठीमागे येऊन घरातील मोठ्या माणसांना नमस्कार करू लागेल, की माझे आई-बाबा रोज आजी-आजोबांना नमस्कार करतात आणि मला सुद्धा नमस्कार करायला पाहिजे ही भावना मुलाच्या मनात आपोआप निर्माण होईल.

लहान वयातच चांगले संस्कार करण्याची आवश्यकता आहे. चांगले संस्कार झाल्याने जीवन आदर्श बनते. चांगले संस्कार झाल्याने जीवन आनंदी बनते. आदर्श पिढीमुळे राष्ट्राचा उद्धार होतो. छत्रपती शिवाजी महाराजांमुळे आदर्श असे हिंदवी स्वराज्य स्थापन होऊ शकले कारण ते स्वतः आदर्श होते. आपणही आदर्श बनलो तर राष्ट्राचाही उत्कर्ष होईल.

डॉक्टर सुधीर देवरे यांच्या कल्पनेतून संस्कार म्हणजे एखाद्या घटनेला कसे सामोरे जायचे हे अनुभवी व्यक्तीने नवशिक्याला समजावून सांगणे म्हणजे संस्कार अशी सुद्धा संस्काराची तात्पुरती, सुटसुटीत व्याख्या करता येते. संस्काराची व्याख्या कोणी कशीही केली तरी, मनाची पाटी कोरी घेऊन जन्मलेल्या मुलाला वाढत्या वयात त्या त्या वेळी त्याच्या आयुष्यात आई, वडील, पालक, गुरुजी, वडीलधाऱ्यांनी समाज, परंपरा, वागणे, बोलणे यांची जाणीव करून देणे, त्याच्या आयुष्याला वळण लावणे म्हणजे संस्कार करणे असे आपल्या सर्वांना अभिप्रेत असते. समाजाच्या उत्थापनेसाठी नवसंस्कार निर्माण केले पाहिजेत. अशा नवसंस्कारात सत्य, अहिंसा, सद्भावना, समता, बंधुभाव, सहिष्णुता, सदाचार, शुद्ध आचरण, स्वच्छता, सुशिक्षित होणे, ज्ञान संपादन करणे, जलसंस्कार, प्रदूषणाविरुद्ध संस्कार, कर्तव्य, वाचन, कला, भाषा, लोकसंस्कृती जतन, प्रज्ञा, शील, करुणा आदी गोष्टींचा नवसंस्कारात समावेश करतात. ते शाळा, कॉलेज, मंदिरात शिकविले गेले पाहिजे.

शिक्षणतज्ज्ञांच्या मतानुसार समाज आणि कुटुंब अनौपचारिक शिक्षणाची महत्त्वाची माध्यमे आहेत. आणि त्याद्वारे मूल शिकत असते आणि असे शिक्षणसुद्धा त्या मुलांच्या जडणघडणीत खूप महत्त्वाची भूमिका निभावणारे ठरते. समाजामध्ये ज्याप्रमाणे स्थितिशीलता असते त्याचप्रमाणे तो बदलतही असतो म्हणजे त्याला गती असते. त्याचे असे बदलणे त्या बदलाचा वेग, त्या समाजाची स्थिती ठरवीत असतो. इतिहासामध्ये अनेक समाजसुधारकांनी समाजाचा विकास व्हावा यादृष्टीने अनुकूल अशी गतिशीलता वाढावी यासाठी परिवर्तनाचे

लढे उभे केलेले आपल्याला दिसतात. या सर्व व्यवहारांचा परिणाम या मुलांच्या जडणघडणीत होत असतो. त्यातून ते शिकत असतात. त्यातून त्यांच्यावर संस्कारही होत असतात.

भारतामध्ये मागील दोनशे वर्षांपासून समाज परिवर्तनासाठी शिक्षणप्रसार आवश्यक आहे. त्याच्याशिवाय समाज परिवर्तन अशक्य आहे हे ओळखून अनेक समाजसुधारकांनी शिक्षणक्षेत्रामध्ये कार्य केले. महाराष्ट्रामध्ये महात्मा जोतिबा फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केली. हा सर्व इतिहास आपल्याला माहिती आहे. आपल्या लोकशाही व्यवस्थेने शिक्षण महत्त्वाचे मानून त्याच्या प्रसारासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्याचे खूप चांगले परिणामही झाले आणि होतही आहेत, तरीही अनेक समस्यांनी ग्रस्त असणाऱ्या आपल्या शिक्षण व्यवस्थेला आणखी खूप मोठा टप्पा गाठायचा आहे. अनेक समस्यांपैकी आपण फक्त शाळाबाह्य मुलांचा प्रश्न या एका समस्येकडे पाहिले की, आपल्याला किती मोठा पल्ला गाठायचा आहे हे लक्षात येते. अशा शाळाबाह्य मुलांना शाळेत आणण्यासाठी शासनाला विशेष प्रयत्न करावे लागतात. नुकताच झिरो ड्रॉप आऊट हा पंधरवडासुद्‌धा शासनाने अभियानरूपी सुरू केला होता. एखाद्या गावातील एखादे मूल शाळाबाह्य झाले, तर त्या गावातील समाज त्या मुलाला शाळेत येण्यासाठी काय करतो हे पाहणे महत्त्वाचे ठरते, कारण शिक्षण प्रसाराबाबत केवळ शासकीय यंत्रणाच कर्तव्यदक्ष आहे की, समाजालाही त्याबाबत काही विचार आहेत, यावर शिक्षण प्रसार अवलंबून असतो हे आपण लक्षात घेतले पाहिजे. ते मूल शाळेत जात नाही, तर ते नक्की काय करते याची माहिती त्याच्या परिसरातील समाज व समूहांना असते. बऱ्याच वेळा ते गावातच कोठेतरी बाल कामगार म्हणून काम करीत असते. त्या वेळेस समाज त्याची नोंद घेतो का? जर घेत नसेल, तर का घेत नसावा? हा मोठा प्रश्न आहे. जर समाजाने त्याची नोंद घेतली, तो शाळेत यावा म्हणून प्रयत्न केले तर महात्मा फुले यांच्या शिक्षणलढ्याची नोंद त्या समाजाने घेतली असे म्हणता येईल. परंतु असे होताना दिसत नाही. ग्रामीण भागाचा या अनुषंगाने विचार केला तर शिक्षण, स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्य, महिलांचे प्रश्न, बालविवाह आदींसारख्या प्रश्नांची समाजानेच नीटशी नोंद घेतलेली नसते, त्यामुळे त्या प्रश्नांकडे सोयीस्कर दुर्लक्ष करणे हे सर्वांना शक्य होते.

गावात दरवर्षी दोन पक्षांचे दोन सप्ताह होतात. लाखो रुपये खर्च केले जातात. तो सर्व खर्च लोक वर्गणीतून होत असतो. अशी लोक वर्गणी शाळेसाठी किंवा तत्सम कामासाठी जमेल का असा प्रश्न केल्यानंतर त्याचे उत्तर नकारार्थीच येते. जशी मंदिरात दानपेटी असते तिचा विनियोग मंदिरासाठी केला जातो. तशी एखादी दानपेटी शाळेसाठी मंदिरात ठेवता येईल का? याचेही उत्तर होय असे पुढे आलेले नाही. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. समाजमन सप्ताह आयोजनाबाबत किंवा मंदिराच्या दानपेटीबाबत जेवढे संवेदनशील असते ती संवेदनशीलता शाळेबाबत का राहत नाही?

याकरिता आता शाळा हेच आपले संस्कार केंद्र आहे हे पाहणे आवश्यक ठरेल. शाळा ही केवळ ज्ञान देणारी इमारत नसते, तर विद्यार्थ्यांवर संस्कार घडविणारे संस्कार केंद्रही असते. मुलांची पहिली शाळा ही आईच असते; परंतु ज्या वेळी मुलगा चार-पाच वर्षांचा होतो तेव्हा प्रत्येक पालक आपल्या पाल्याला एखाद्या

चांगल्या शाळेत दाखल करण्याचा प्रयत्न करतात. सर्व जण चांगल्या शाळेच्या शोधात असतात. परंतु चांगली शाळा म्हणजे काय हो? मोठी इमारत, मोठे क्रीडांगण, बाग, पिण्याचे पाणी, डिजिटल वर्गखोल्या एवढेच तर नाही ना! या तर आवश्यक बाबी आहेतच. या सर्व सोयी असल्या तर आपण त्या शाळेला चांगली शाळा म्हणू; पण आदर्श शाळा म्हणता येणार नाही.

आदर्श शाळा ही नुसती शाळा नसून ते एक विद्यार्थी घडविण्याचे केंद्र असते. आदर्श शाळेत सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे हुशार, अनुभवी, प्रेमळ शिक्षकवर्ग. शिकविणारे शिक्षक आदर्श असतील, तर शाळासुद्धा आदर्श बनते आणि अशा शाळेत विद्यार्थ्यांना खेळीमेळीच्या वातावरणात शिकविण्याचे काम सुरू असते. चांगल्या शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास ज्या शाळेत होतो ती आदर्श शाळा ठरते. कारण फक्त शिक्षण घ्यायचे असेल, तर ते कोठेही मिळते; पण विद्यार्थ्यांमधील खिलाडू वृत्ती, कला, संशोधक वृत्ती इत्यादी बऱ्याच गुणांना वाव मिळवून देण्यासाठी मंच उपलब्ध करून देणे व त्या योग्य व्यक्तीकडून योग्य वेळी मार्गदर्शन करणे हे अत्यंत महत्त्वाचे असते.

सध्याच्या धावपळीच्या जीवनात पालकांकडे पुरेसा वेळ नाही. आपल्या पाल्यासाठी पालकांची मानसिकता बदललेली आहे. चांगल्या शाळेत प्रवेश घेऊनसुद्धा दुसरीकडे कोचिंग क्लासेससुद्धा लावतात. अशा परिस्थितीत केवळ पालकांना दोष देऊन चालणार नाही, तर यावर तोडगा काढावा लागेल आणि हे सुद्धा शाळेचेच काम आहे. अशा स्थितीत ज्या शाळेतील शिक्षक हे शिक्षक व पालक अशी दुहेरी भूमिका निभावतात. ते शिक्षक व ती शाळा आदर्श शाळा ठरते. योग्य शिक्षण मिळाले, सुप्त गुणांचा विकास झाला, पण विद्यार्थ्यांमध्ये मूल्य नसतील, तर त्याचा काय उपयोग? शिक्षण तर जीवन जगण्याची कला शिकविते. माणसाला माणूस बनविते. आजच्या धकाधकीच्या जीवनात माणूस प्रगती तर करीत आहे, परंतु त्याच्यामध्ये मानवता हळूहळू नष्ट होताना दिसत आहे. स्वार्थी वृत्ती वाढत आहे. स्पर्धेच्या युगात चांगले-वाईट यातील फरक समजून न घेता प्रत्येक व्यक्ती पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहे आणि अशा वेळी तो दुसऱ्यांना सोबत न घेता त्यांना खाली पाडून स्वतः पुढे कसे जाता येईल याचाच विचार करत आहे आणि हे सर्व घडत आहे ते मुलांमधील मूल्य शिक्षणाच्या अभावामुळे, म्हणून मुलांना लहानपणापासूनच मूल्यशिक्षण देणे अत्यंत गरजेचे आहे. जी शाळा विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षण देण्यात यशस्वी होते तीच आदर्श शाळा ठरते. एकंदरीत विद्यार्थ्यांना भौतिक सोयीसुविधा देण्याबरोबरच योग्य शिक्षण, योग्य संस्कार त्यांच्यामधील सुप्त गुणांचा विकास करणारी शाळाच आदर्श शाळा ठरते.

श्री. संदीप वारगे
**आदर्श शाळा वायशेत, अलिबाग,**
**जि. रायगड**

# आनंददायी शिक्षणाच्या नव्या वाटा

## भविष्यवेधी शिक्षण उपक्रमांतर्गत कृतियुक्त अध्ययन–अध्यापन आणि भविष्यवेधी आनंददायी शिक्षण

**प्रास्ताविक :**

'करके देखो, गहरा सोचो' या उक्तीप्रमाणे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, मानवत येथे विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासाकरिता विविध उपक्रम राबविण्यात येतात.

कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय हे निवासी विद्यालय असल्यामुळे येथे येणाऱ्या बालिका शाळाबाह्य, वंचित घटकांतील, अडचणी असणाऱ्या, ऊसतोड कामगार, विटभट्टी कामगार, भूमिहीन शेतमजूर, अनाथ, एकच पालक, परित्यक्त्या इत्यादी पालकांच्या पाल्य असतात. तसेच आमच्या विद्यार्थिनी या शिक्षणाविषयी अनास्था असणाऱ्या भागातील व ज्यांना पोटांची भ्रांत असते अशा घटकांतील असतात. असे म्हटले जाते की, ''पोटाच्या व शिक्षणाच्या लढाईत नेहमी पोटाचाच विजय होतो.'' त्यामुळे आमच्या विद्यार्थिनींना पालकांच्या अडचणींतून काढून विद्यालयात निवासी टिकविणे, रमविणे, शिक्षणात गुंतवून त्यांच्या शिक्षणात सातत्य ठेवणे. तसेच विद्यार्थिनींचे बालविवाह रोखण्यासाठी मुलींना व पालकांना परावृत्त करणे हे आमच्या पुढे यक्ष प्रश्न असतात. याचे कारण मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण जर कमी झाले, तर बालविवाहाचे प्रमाण वाढेल. तसेच शहरी व ग्रामीण भागात नव्याने फोफावणारा शहरी नक्षलवाद रोखणे हा देखील या पाठीमागचा दूरगामी उद्देश आहे. विद्यालयात काम करीत असताना शिक्षिकेचीच नव्हे, तर आईची भूमिकाही पार पाडावी लागते.

मागील दोन वर्षांपासून जागतिक स्तरावर फैलावलेल्या कोरोना महामारीच्या संकटामुळे सर्व विद्यालये व महाविद्यालये बंद होती. यावर्षी शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये २५–१०–२०२१ पासून मा. जिल्हाधिकारी महोदया श्रीमती आचल गोयल यांच्या परवानगीने आमचे विद्यालय सुरू करण्यात आले. मागील दोन वर्षांत झालेले शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी तसेच कोरोना महामारीच्या काळात विद्यार्थिनींना मानसिकदृष्ट्या व शारीरिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी समुपदेशन पूरक कार्यक्रम जसे की, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन, खेळ, योगासने, व्यायाम, पोषक आहार (व्हेज/नॉनव्हेज) इत्यादी कार्यक्रम/उपक्रम राबविले जातात.

विद्यार्थिनींमध्ये नैतिक मूल्ये रुजविण्यासाठी भविष्यवेधी शिक्षण विचारांतर्गत मानवत तालुक्यातील Happiness Curriculum चा दिल्ली मॉडेलवर आधारित उपक्रम 'आनंददायी शिक्षण' राबवीत आहोत. या व्यतिरिक्त विद्यार्थिनींच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी विषयमित्र संकल्पना, कृतियुक्त गट अध्यापन पद्धती, स्व–अध्ययन पद्धती, क्षेत्रभेट, Spoken English, आंतरराष्ट्रीय जपानी भाषा अध्ययन इ. उपक्रम राबविले जातात.

## नवोपक्रम अहवाल लेखन :

### १) नवोपक्रमाची गरज व महत्त्व :

कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, मानवत येथे हा उपक्रम राबविण्याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे ही शाळाबाह्य, विविध स्तरांतील, विविध ठिकाणांहून आलेल्या मुलींची निवासी शाळा आहे, म्हणून विद्यार्थिनींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकून ठेवणे व त्यांचे भविष्य आनंदी–सुखकर करणे हे आहे.

### २) नवोपक्रमाची उद्दिष्टे :

अ) या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होते.

ब) विद्यार्थिनींना भविष्याविषयी निश्चित दिशा मिळते.

क) विद्यार्थिनींमध्ये मूल्यशिक्षणाची बीजे रुजवली जातात.

ड) नेतृत्व व सहकार्य वृत्ती वृद्धिंगत केली जाते.

इ) विद्यार्थिनींमध्ये नवनिर्मिती–सर्जनशीलतेला वाव मिळतो.

### ३) नवोपक्रमाचे नियोजन व कार्यवाही :

मा. श्री. संजय ससाणे (ग. शि. अ. पं. सं. मानवत) साहेब यांच्या मार्गदर्शनाने Future Ready Education ही नवीन संकल्पना आमच्या शाळेस नवसंजीवनी ठरली. कोरोनाकाळ ही समस्या नाही, तर संधी आहे असे म्हणून आपण भविष्याच्या दृष्टीने काय–काय करू शकतो याविषयी आयोजित कार्यशाळेत आम्ही सहभागी झालो. कार्यशाळेत मिळालेला मंत्र म्हणजे प्रत्येक मूल वेगळे असते त्यासाठी मूलनिहाय नियोजन करून विद्यार्थ्यांसाठी विविध आव्हानांची यादी तयार केली. मूलनिहाय नियोजनामुळे मुलींचे विविध गट तयार करण्यासाठी आम्हांला मदत झाली यामध्ये आम्ही ASER, NAS व PISA या तीन स्तरांवर काम करण्याचे ठरविले. त्यानुसार इयत्ता सहावी ते दहावीच्या वर्गांचे तीन गट तयार करून साहित्य निर्मितीला सुरुवात करण्यात आली. यामध्ये हस्तनिर्मित शैक्षणिक साहित्यावर भर देण्यात आला. तीन गट निवडून त्या गटांसाठी विद्यार्थ्यांमधून विषयमित्र ही संकल्पना राबविण्यात आली. हे विषयमित्र आपल्या गटातील सर्व मुलांच्या समस्या समजून घेऊन सोडविण्याचा प्रयत्न करतात. मुलींना आपल्या अध्ययनात येणाऱ्या समस्या नि:संकोचपणे, निडरपणे आपल्या विषयमित्रांकडे मांडता येत होत्या. त्यामुळे सर्व जण प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत होते. या वेळी त्या गटामध्ये Peer-learning चा देखील वापर होतो. त्यामुळे सोबतीने एखादे आव्हान पार करताना सहकार्य वृत्ती वृद्धिंगत होते. या सर्व प्रक्रियेत शिक्षिका प्रगत मार्गदर्शकाच्या भूमिकेत विद्यार्थ्यांसोबत काम करते. त्याचबरोबर आनंददायी शिक्षण हे इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गांसाठी राबविले जाते. या Happiness Curriculum मध्ये दररोज पहिली तासिका

आनंददायी शिक्षणावर घेतली जाते. यामध्ये सोमवार ते शनिवार तासिकेचे विभाजन पुढीलप्रमाणे ठरलेले असते.

सोमवार – सजगता

मंगळवार – कथा

बुधवार – कथा

गुरुवार – कृती

शुक्रवार – कृती

शनिवार – अभिव्यक्ती

ही प्रत्येक तासिका ३५ मिनिटांची असते.

**वेळेचे नियोजन : ३५ मिनिटे**

| | | |
|---|---|---|
| Check in | – | १५ मिनिटे |
| चर्चा | – | ०८ मिनिटे |
| कृती | – | ०५ मिनिटे |
| चर्चा | – | १५ मिनिटे |
| Check out | – | ०२ मिनिटे |
| एकूण | – | ३५ मिनिटे |

आनंददायी शिक्षणासाठी विशिष्ट कथा, कृती व अभिव्यक्तीविषयी अभ्यासक्रम ठरविलेला आहे तो नियोजित वेळापत्रकाप्रमाणे घेतला जातो. यामुळे मुलांना व पालकांना स्वयंमूल्यमापन करणे शक्य झाले. मुलांमध्ये आनंदी वृत्तीचा विकास झाला. आपण जी कृती करतो ती नैतिक मूल्यांना धरून आहे, की नाही याची जाणीव मुलांना करता येते. सभोवतालच्या परिस्थितीचे निरीक्षण करून, कृती करून ज्ञान व आकलन करणे सोपे होते. आनंदी वातावरणात अध्ययन–अध्यापनामुळे उपस्थितीवर निश्चितच सकारात्मक फरक पडतो.

**४) नवोपक्रमाची फलनिष्पती :**

अ) या उपक्रमामुळे विद्यार्थी सतत कृतिशील राहतो.

ब) विद्यार्थिनींमध्ये सकारात्मक विचार करण्याची क्षमता निर्माण होते.

क) विद्यार्थिनींमध्ये नेतृत्व गुणांचा विकास होतो.

इ) विद्यार्थिनींमध्ये सहकार्य वृत्ती वाढते.

ई) विद्यार्थिनींमध्ये नवनिर्मिती व सर्जनशीलतेला वाव मिळतो.

उ) सर्व शिक्षिकांमध्ये विचारांची देवाणघेवाण होते. त्यातून नवीन साहित्य व साधनांची निर्मिती होते.

ऊ) एकूणच शाळेचे वातावरण आनंदी व सकारात्मक बनते.

## ५) समारोप :

अ) वर्गाध्यापन करीत असताना विविध स्तरांतील मुलींना विविध कृती देताना आपण कुठेतरी कमी पडत आहोत का? हा विचार मनाला नेहमी छेदत असे. मात्र विषयमित्र व गट अभ्यासामुळे हे काम अतिशय सोपे झाले.

ब) हे करीत असताना अनेक अडचणी आल्या. बऱ्याच वेळा साहित्यनिर्मिती करीत असताना अपुरे साहित्य असायचे, वेळेची मर्यादा असायची. आपला विषय आपल्या तासात पूर्ण व्हायचा नाही. मात्र विद्यार्थिनी स्वतः साहित्य निर्मितीचा आनंद घेऊन ते तयार करण्यात रमू लागल्या अन् प्रश्न सुटू लागले. वेळेचा प्रश्न एक दिवस-एक विषय असे नियोजन करून सोडविला.

क) या उपक्रमामुळे अभ्यासक्रम एकतृतीयांश वेळेत पूर्ण होतो व उर्वरित वेळ हा व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी उपयोगी आणला जातो. अध्ययन-अध्यापन शैक्षणिक साहित्यातून गुणवत्तापूर्ण होते.

ड) या उपक्रमाचा उपयोग विद्यार्थिनी, शिक्षिका व पालकांना पूरक ठरतो.

## ६) संदर्भ सूची :

अ) इयत्ता पहिली ते पाचवीची पाठ्यपुस्तके

–

**कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय,**

**जि. प. केंद्रिय प्राथमिक शाळा, मानवत,**

**जि. परभणी**

◈◈◈

# प्रेरणेचे बळ देणारी माझी शाळा

### शाळेची सर्वसाधारण माहिती व वैशिष्ट्ये

- मुख्याध्यापक कक्ष व ७ वर्गखोल्यांसह शाळेची इमारत सुसज्ज आहे.
- शाळेत सर्व वर्गखोल्यामध्ये उत्कृष्ट दर्जाची साऊंड सिस्टीम कार्यरत आहे.
- शाळेत महाराष्ट्र शासन पुरस्कृत व्हर्च्युअल क्लासरूम कार्यरत आहे.
- शाळा व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व वर्ग व शालेय परिसर सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याच्या कक्षेत आहेत.
- संगणक शिक्षणासाठी शाळेत इंटरनेट व वायफाय सुविधेसह सुसज्ज संगणक प्रयोगशाळा कार्यरत आहे.
- अध्ययन–अध्यापनासाठी शाळेत सर्व वर्गात एल.सी.डी. प्रोजेक्टर कार्यरत आहे.
- विज्ञान विषयाच्या अध्ययन–अध्यापनासाठी सर्व साहित्यासह प्रयोगशाळा उपलब्ध आहे.
- शाळेत ४०१८ चौ.फूट सुसज्ज क्रीडांगण उपलब्ध आहे.
- विद्यार्थ्यांना अवांतर वाचनासाठी कथा, कादंबरी, गोष्टी, शब्दकोश व संदर्भ ग्रंथासह सुसज्ज ग्रंथालय उपलब्ध आहे.
- शाळेत R.O. फिल्टर सुविधेसह पिण्याचे पाणी उपलब्ध आहे.
- शाळेत मध्यान्ह भोजन शिजवणेसाठी गॅस सिलेंडरसह फायबर ॲडजेस्टेबल किचन शेड उपलब्ध आहे.
- विद्यार्थ्यांना हात धुण्यासाठी हॅण्डवॉश स्टेशन उपलब्ध आहे.
- शाळेत पाणी पुनर्भरण प्रक्रियेसाठी रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम उपलब्ध आहे.

### नेतृत्व व संघकार्याच्या माध्यमातून शाळा विकास :

#### असीम प्रयत्नांची यशोगाथा :

'कर्तुत्व व दातृत्व एकत्र येते जेव्हा... माळरानही फुलते तेव्हा...' आयुष्यात कोणतीही गोष्ट सहजासहजी मिळत नाही. त्यासाठी जिद्द, चिकाटी, परिश्रम अंगीकारणे आवश्यक आहे तरच यश प्राप्तीच्या शिखरावर चढता येते व हे शक्य करून दाखवले. आमच्या शाळेतील संघशक्तीने, एकीने. शाळा विकासाचे ध्येय समोर ठेवून शाळेच्या परिवर्तनाचा निश्चय करून नावलौकिक मिळविलेल्या कराड तालुक्यातील पेंबर शाळेची ही यशोगाथा.

या शाळेची दलदलयुक्त जमीन, बदलते वातावरण आणि जीर्ण झालेली इमारत दिवसेंदिवस धोकादायक बनत चालली होती. सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून नवीन इमारत उभी करणे आवश्यक बनले होते, सन २०१६–१७ या वर्षात नवीन शालेय इमारत बांधकामाची मागणी जोर धरू लागली. परंतु इतकी मोठी

इमारत बांधकामासाठी निधी हा लोकसहभागातून उभा करणे शक्य नव्हते. शिवाय शासकीय निधी मिळणेही शक्य नव्हते, म्हणूनच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य श्री. वैभव ढाणे यांच्या कल्पनेतून 'इमर्सन क्लायमेंट टेक्नॉलॉजी' प्रा. लि. अतीत यांच्याकडे CSR फंडातून ७ वर्गखोल्यांचे बांधकाम करून देण्यासंदर्भात सातत्याने शाळा व्यवस्थापन समिती व शाळेतील शिक्षकांनी पाठपुरावा केला. या मागणीला कंपनीचे प्रोडक्शन मॅनेजर श्री. पाटील ए. जी. यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे जिल्ह्यातील पहिली भूकंप प्रतिरोधक, सुसज्ज अशी आठ वर्गखोल्यांची इमारत पूर्णत्वास आली. कंपनीच्या माध्यमातून ७० लाखांची इमारत सात वर्गखोल्या बांधकाम केले व समग्र शिक्षा अभियान १ वर्गखोली बांधकाम केले. तसेच शाळेला भौतिक सुविधांनी संपन्न करण्यावर भर दिला आहे.


शाळेची जुनी इमारत



शाळेची नवीन इमारत

शाळा शिक्षकांच्या एकीतून व लोकसहभागातून भौतिक सुविधांनी सुसज्ज तर झालीच. त्याचबरोबर गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे नावारूपास देखील आली.

**भौतिक सुविधा :**

- सी.सी.टी.व्ही. यंत्रणा
- हॅण्डवॉश स्टेशन
- एल.सी.डी. प्रोजेक्टर
- रेन वॉटर हार्वेस्टिंग
- मुलींसाठी सव्च्छतागृहे
- संगणक प्रयोगशाळा

**मुख्याध्यापक व शिक्षक स्व-विकास व त्याचा फायदा :**

गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांनी देखील आपल्या कलागुणात, शैक्षणिक पात्रतेत वाढ केली. सध्याच्या संगणक युगात स्वतः वावरण्याबरोबरच आपले विद्यार्थीदेखील संगणक युगात अगदी सहजतेने रमावेत यासाठी शिक्षक व मुख्याध्यापकांनी आधुनिक तंत्रज्ञान अवगत केले. शिक्षकांबरोबरच मुलेदेखील संगणक व प्रोजेक्टर सहजतेने हाताळू लागली. गुगल, यू-ट्यूब या माध्यमाद्वारे शैक्षणिक माहिती शोधू लागली. नवनवे शोध व शंकानिरसनदेखील या तंत्रज्ञानामुळे सुकर झाले.

स्मार्ट टी.व्ही. मुळे वर्गात पाठ्यपुस्तकातील पाठ, कविता यांचे बोलके चित्र विद्यार्थ्यांना दाखविता आले. क्यूआर कोड च्या माध्यमातून दीक्षा ॲपच्या मदतीने पालकदेखील मुलांचा अभ्यास तंत्रज्ञानाच्या


मदतीने घेऊ लागले. तसेच प्रत्येक वर्गाचे व्हॉट्सअॅप ग्रुप केल्यामुळे पालकांशी सहज संवाद साधला गेला. वर्गातील व शाळेतील कृती, सराव, गृहपाठ घरापर्यंत पोहोचू लागला. या आधुनिक तंत्रज्ञानाचा सर्वांत मोठा फायदा कोविड-१९ च्या लॉकडाऊन काळात शिक्षक व विद्यार्थी, पालक यांना झाला.


शाळापूर्व आनंददायी वर्ग

'शाळा बंद पण शिक्षण सुरू' या उपक्रमांतर्गत मुले पालक व शिक्षक शाळेशी जोडून राहिले. याच काळात शिक्षकांनी विविध ऑनलाइन प्रशिक्षणे घेतली. तंत्रज्ञान विकासात वाढ झाली.

तसेच शाळा विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आवश्यक त्या उणिवा दूर करण्याचा मुख्याध्यापक व शिक्षक सातत्याने प्रयत्न करीत असतात. याचाच परिणाम म्हणून विद्यार्थी पटसंख्येत झपाट्याने वाढ होत आहे. परिसरातील व गावातील मुले इंग्रजी माध्यमातील मुले शाळेकडे वळू लागली. शिक्षकांच्या सहविचारातून शाळेमध्ये अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत व अनेक उपक्रमांमध्ये पालकांचा सहभागदेखील आवर्जून घेतला जातो.

उदा : १) बाल बाजार २) स्नेहसंमेलन ३) मातृपूजन दिन ४) पिता-पुत्र उपक्रम - पतंग उडवणे. ५) हळदीकुंकू ६) महिला उद्बोधन वर्ग ७) बाल विज्ञान मेळावा ८) क्षेत्रभेटी ९) कार्यानुभव कार्यशाळा इ. या सर्वांमुळे पालकांचे उद्बोधन करण्यात यश मिळाले आहे. पाहा - https://youtu.be/DL5FF8bw5tY



- **आंतरराष्ट्रीय शाळा निवड :**

सन २०१९–२० मध्ये शाळेला महाराष्ट्र राज्य आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाकडून शाळेला आंतरराष्ट्रीय शाळा संलग्नता मिळाली.



**तत्कालीन राज्यपाल मा. विद्यासागर राव, तत्कालीन शिक्षणमंत्री मा. विनोद तावडे यांचे हस्ते आंतरराष्ट्रीय शाळा संलग्नता प्रमाणपत्र स्वीकारताना मुख्याध्यापक**

महाराष्ट्र राज्यातील ८१ निवडक शाळांमध्ये पेंबर शाळेची वर्णी लागली. शिक्षक व शालेय व्यवस्थापन समिती यांच्या प्रयत्नातून शाळेची जडणघडण योग्य मार्गाने होत आहे.

**अध्ययन–अध्यापन पद्धतीतील बदल व अध्ययन निष्पत्तीत वाढ :**

शाळेला आंतरराष्ट्रीय दर्जा लाभल्यामुळे अध्ययन–अध्यापन पद्धतीत देखील अनेक सकारात्मक बदल घडून आले. विषयगोफ पद्धती यामध्ये एका विषयातून दुसऱ्या विषयात जाणे. एका विषयाचा संबंध दुसऱ्या विषयाशी घालणे. यामुळे विद्यार्थ्यांना अवघड विषय ही सोपे वाटू लागले. त्यांचेकडून अनेक प्रकारच्या अध्ययनपूरक कृती करून घेतल्या जातात.



**अध्ययनपूरक कृती करताना विद्यार्थी**

उदा. (१) आनंददायी शिक्षण, (२) चर्चा पद्धती,
(३) गटपद्धती, (४) खेळातून शिक्षण,
(५) क्षेत्रभेटी, (६) कला–कार्यानुभव कार्यशाळा,
(७) साहित्य–संगीतमय कवायत, (८) प्राणायाम व योगासने इ. चा वापर.

इत्यादींचा वापर अध्ययन–अध्यापन समृद्ध करण्यास होत आहे. त्याचबरोबर भाषा, गणित, इंग्रजी पेटीचा वापर केल्यामुळे अध्ययन–अध्यापन सोपे होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांचा सराव होण्यास याची मदत झाली.

- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरामुळे अध्ययन–अध्यापन सोपे व परिणामकारक झाले. ई–लर्निंग हा शिक्षणाचा केंद्रबिंदू होऊ लागला. यासाठी शिक्षकांनी आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी प्रयत्न केला.
- स्पर्धा परीक्षा तयारीसाठी जादा तास घेतले जातात.
- विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनाची सवय लागण्यासाठी शाळा सुटल्यानंतर ज्यादा तास घेतले जातात. संगणक कक्ष शाळेत असल्यामुळे विद्यार्थी संगणक प्रेमी बनले. संगणक सहजतेने हाताळू लागले. त्यांच्यामध्ये सर्जनशीलता निर्माण होऊ लागली. याचाच परिणाम म्हणून विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये आत्मविश्वासाने भाग घेऊ लागले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, मानसिक व भावनिक विकास होण्यास मदत झाली व या सर्वांमुळे अध्ययन निष्पत्तीचा आलेख उंचावण्यास मदत झाली.

### शाळा विकासात शिक्षक–पालक संघ व शालेय व्यवस्थापन समितीचा सहभाग

दर महिन्याला शाळेमध्ये शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षक–पालक सभा घेतल्या जातात. त्यामुळे शाळा व्यवस्थापन समिती पालक व शिक्षक यांमध्ये समन्वय साधला गेला. याचा उपयोग शाळा व विद्यार्थी विकास झाला.

व्यवस्थापन समिती सदस्य शिक्षक व शाळेच्या समस्या समजून घेऊन त्याचे निराकरण करतात. वेळोवेळी शिक्षकांना मोलाचे मार्गदर्शन करतात. पालकदेखील मुलांना मार्गदर्शन करतात. कलाप्रेमी, क्रीडाप्रेमी, पालक शाळेतील विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करतात. शाळेमध्ये महिन्यातील तिसऱ्या शुक्रवारी कौशल्य उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये विविध कौशल्य मुलांना पालक, ग्रामस्थ शिकवितात.

तसेच दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी क्षेत्रभेटीचा उपक्रम आयोजित केला जातो. यामध्ये देखील पालक सहभाग घेतात व गरज असेल तेथे मदतदेखील करतात. शाळेतील उपक्रमात, कार्यक्रमात पालक व व्यवस्थापन समिती उत्साहाने भाग घेतात, तसेच ते पार पाडण्यासाठी सहकार्य करतात.

शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांच्यामुळे शाळा विकासास मोलाची साथ मिळाली.

*''चिरा चिरा हा घडवावा, कळस कीर्तीचा चढवावा''*

याप्रमाणे शिक्षक, विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ व ग्रामपंचायत यांच्या सहकार्याने शाळेचा नावलौकिक वाढत चालला आहे.

### मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांनी राबवलेला नवोपक्रम

एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत असताना नवनवीन शोध, तंत्रज्ञान व विकास झपाट्याने घडवून येत आहे, पण त्याचबरोबर त्याच गतीने पर्यावरणाचा ऱ्हासदेखील होत चालला आहे. म्हणूनच पर्यावरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी पर्यावरण नवोपक्रमांची निवड करण्यात आली.

**विषय** : पर्यावरण संरक्षण व संवर्धन

**उद्दिष्ट** : विद्यार्थिदशेपासूनच मुलांना पर्यावरण पर्यावरणाचे महत्त्व समजावे, त्याचे रक्षण करणे व संवर्धन करणे याची जाणीव निर्माण करणे.

**कार्यवाही :**



१) वृक्षदिंडी व जनजागृतीपर फेरी : झाडे लावणे व त्याचे संरक्षण व संवर्धन करण्याची शपथ घेणे. जून महिन्यात वृक्षदिंडी काढणे व झाडांचे वाटप.

२) कुंडीतील लागवड : शाळा व घर येथे कुंडीत झाडे लावणे.

३) एक मूल, एक झाड : प्रत्येकाने एक झाड आपल्या परिसरात लावणे.

४) पर्यावरणविषयक व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

५) परिसरातील वनस्पतींची माहिती संकलन करणे हा प्रकल्प मुलांनी राबविला.

६) भारतीय सण व निसर्ग यासंदर्भात विविध वृक्षांची माहिती मुलांनी गोळा केली.

७) पर्यावरणविषयक व पर्यावरणपूरक सण व उत्सव.

- **होळी :** लाकडे न जाळता, कचऱ्याची होळी करणे, ग्राम स्वच्छता करणे. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करणे. यामुळे प्रदूषणाला आळा बसण्यास मदत झाली.
- **गणेश उत्सव :** इकोफ्रेंडली गणेश मूर्ती बसवली व त्याचे विसर्जन घरीच हौदात करून ते पाणी झाडांना घालणे. सण, कार्यक्रम इत्यादींमध्ये प्लॅस्टिक, थर्माकोलचा वापर न करणे यासंदर्भात जागृती करणे.



८) पर्यावरण संरक्षण व संवर्धन : या विषयावर संदर्भात शाळेमध्ये निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेतल्या.

९) 'खंडोबा यात्रा' पाल गावात संपन्न झाल्यानंतर ग्राम स्वच्छता उपक्रम राबवला.

अशाप्रकारे वेगवेगळ्या मार्गांनी विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव जागृती करण्याचा प्रयत्न या नवोपक्रमातून करण्यात आला.

**फलनिष्पत्ती :**

१) मुलांमध्ये निसर्गाची आवड निर्माण झाली.

२) पर्यावरणाची जपणूक करणे ही आपली जबाबदारी आहे हे लक्षात आले.

३) मुलांनी आपल्या घरातील व्यक्तींना देखील पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले.

४) पर्यावरणपूरक सण, उत्सव साजरे करण्याबाबत समाजात बदल घडून येण्यास मदत झाली.

५) प्रदूषणाविषयी जाणीव जागृत होण्यास मदत झाली.

## शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर

सन २०१९-२० या वर्षांत शाळा, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ व ग्रामपंचायत यांच्या मदतीने शाळा डिजिटल करण्यात यश मिळाले. शाळेमध्ये प्रोजेक्टर, संगणक, प्रिंटर, वायफाय इत्यादी सुविधा असल्यामुळे अध्ययन-अध्यापनात व प्रशासकीय कामात तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

- व्हर्च्युअल क्लासरूम व संगणकाचा वापर मुले व शिक्षक सहजतेने करतात व यामुळे शिक्षण प्रक्रिया सुकर बनली आहे.
  - ➢ संगणकातील एज्युकेशन सॉफ्टवेअरमुळे पुस्तके बोलकी झाली. सरावासाठी मुले त्यांचा वापर करू लागली.
  - ➢ महाराष्ट्र शासनाकडून शाळेला व्हर्च्युअल क्लासरूम मिळाली आहे. त्यामुळे राज्य स्तरावरून दिलेले प्रशिक्षण व माहिती आमच्यापर्यंत सहजतेने पोहोचण्यास मदत झाली.
  - ➢ स्पर्धा परीक्षा, सराव प्रश्नपत्रिका सोडविणे इत्यादी कामे मुले प्रोजेक्टवर करू लागली.
  - ➢ यू-ट्यूबचा वापर अध्ययन-अध्यापनात होऊ लागला. गुगलवर अनेक प्रश्न शोधले जाऊ लागले. याचा खूपच चांगला प्रतिसाद अध्ययन-अध्यापनात दिसत आहे.




**व्हर्च्युअल क्लासरूमचे उद्घाटन करताना**
**मा. शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड,**
**मा. विशाल सोळंकी, शिक्षण आयुक्त**
**मा. दिनकर पाटील, संचालक SCERT पुणे**

  - ➢ तंत्रज्ञानामुळे प्रशासकीय कामकाज सुकर व पेपरलेस झाले आहे. प्रत्येक वर्गाचा व्हॉट्सअॅप ग्रुप तयार केल्यामुळे शिक्षक-पालक संपर्क सहजतेने होत आहे. शिक्षण घराघरात पोहोचण्यास मदत झाली आहे.

- लॉकडाऊन काळात सर्व शिक्षक व मुख्याध्यापकांनी झूम ॲप, गूगलमीट, व्हॉट्सॲप ग्रुप या माध्यमांतून विद्यार्थी व पालक यांच्याशी संपर्क ठेवण्यात यश मिळविले आहे.
- दीक्षा ॲप वापरातून पालक देखील मुलांचा अभ्यास घरी घेऊ लागले.
- गुगल फॉर्मद्वारे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करता आले.
- जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, फलटण, जि. सातारा यांनी तयार केलेल्या कृतिपत्रिका विद्यार्थ्यांकडून सोडवून घेतल्या.
- स्वाध्याय उपक्रमात ही सर्व विद्यार्थी आनंदाने सहभागी होतात व सोडवतात.
- शैक्षणिक दिनदर्शिका महिनावार, आठवडानिहाय शैक्षणिक नियोजन, पीडीएफ सर्व पालकांपर्यंत पोहोचवून त्यांची माहिती देण्यात आली आहे.
- 'गोष्टींचा शनिवार' या उपक्रमांतर्गत दर शनिवारी मुले मोबाईलवर आलेली गोष्ट आवडीने वाचतात. त्यामुळे वाचन प्रभावी होण्यास मदत झाली आहे.

अशाप्रकारे तंत्रज्ञानामुळे अध्ययन व अध्यापन प्रक्रिया सहजसोपी बनली आहे.

पाहा : https://youtu.be/BoBQf7wCqgY

## गुणवत्ता वाढीस लाभदायक प्रशिक्षणे :

महाराष्ट्र राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी आणि प्रशिक्षणे अध्यापन अद्ययावत करण्यास प्रभावी ठरली आहेत.

१) **भाषा व गणित विकास प्रशिक्षण :** यामुळे भाषा व गणित विषयक संबोध स्पष्ट होण्यास तसेच विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेत वाढ होण्यास मदत झाली आहे.

२) **भाषा, गणित व इंग्रजी पेटी प्रशिक्षण :** यामुळे शैक्षणिक साधनांचा सहज सुलभ वापर करणे व शैक्षणिक जाणीव समृद्ध करण्यास मदत झाली.

३) **महाराष्ट्र राज्य आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ :** यांच्यातर्फे आयोजित प्रशिक्षणामुळे शिक्षकांच्या मानसिकतेत बदल झाला आहे. शिक्षण प्रवाहाची नवी दिशा उमगली व त्यामुळे विद्यार्थी विकासात भर पडली आहे.

४) **निष्ठा प्रशिक्षण :** शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबर विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व व सर्वांगीण विकास करणेसाठी हे प्रशिक्षण शिक्षकांना मार्गदर्शक ठरले.

५) **अध्ययन निष्पत्ती प्रशिक्षण :** या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील उणिवा दूर करणे व त्यास उच्चतम पातळीकडे नेण्यास मदत झाली.

६) **मूल्यवर्धन :** यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक विचार, सामाजिक भावना, नेतृत्व व सहकार्य इत्यादी गुणांची जाणीव जागृती करण्यास मदत झाली.

७) **अपंग समावेशित शिक्षण :** दिव्यांग मुलांना सामान्य मुलाबरोबर शिक्षणाची संधी निर्माण करणे यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरले.

८) **लॉकडाऊन काळातील प्रशिक्षण :** झूम, गुगल मीट चा वापर, ऑनलाइन टेस्ट तयार करणे, अध्ययन–अध्यापन अहवाल, माझे कुटुंब माझी जबाबदारी, अध्ययन निष्पत्ती, कृतिपत्रिका, रीड टू मी ॲप, शिक्षक मार्गदर्शिका, पूरक साहित्य व प्रशिक्षण इत्यादींमुळे अध्ययन–अध्यापनात प्रभावी बदल घडून येण्यास मदत झाली.

**विविध स्तरांवर शाळेला मिळालेले यश :**



- **यशवंत व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा :**
  यामध्ये तालुका स्तरापर्यंत विद्यार्थ्यांनी यश मिळविले.
  १) लहान गट, मोठा गट – कुस्ती स्पर्धा, प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक.
  २) लोकनृत्य – शेतकरी नृत्य
  ३) कविता सादरीकरण
  ४) चित्रकला स्पर्धा – तृतीय क्रमांक
  ५) बुद्धिबळ सहभाग.
  ६) लंगडी – द्वितीय क्रमांक
- कराड तालुका शिक्षण महोत्सवात शाळेने आधुनिक तंत्रज्ञान व दीक्षा ॲपचा अध्ययन–अध्यापनात वापर करणे या विषयावर शैक्षणिक स्टॉलची मांडणी व सादरीकरण केले.
- बहुजन समाज समितीमार्फत शाळेस आदर्श शाळा व्यवस्थापन समितीचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.
- स्काऊट गाईड तालुका स्तर मेळाव्यात विद्यार्थी सहभाग व लेखी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवला.
- स्पर्धा परीक्षांमध्ये शिष्यवृत्ती, नवोदय इ. मध्ये १००% विद्यार्थी सहभाग.
- गतवर्षी शिष्यवृत्ती परीक्षेचा शाळेचा ७५ टक्के निकाल लागला.


डॉ. सतीश फरांदे
**अधिव्याख्याता तथा जिल्हा नोडल अधिकारी**
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, फलटण. जि. सातारा**
सौ. राजेश्री मिलिंद तोडकर,
**मुख्याध्यापिका, जि. प. प्राथ. केंद्रशाळा, पेंबर,**
**ता. कराड, जि. सातारा**

# मनातील शाळा

'ही आवडते मज मनापासुनी शाळा' या सानेगुरुजींच्या गीताच्या ओळींचा प्रत्यय तुमच्या विद्यार्थ्यांना येणे यासारखी आनंदाची गोष्ट तुम्हा शिक्षकांसाठी दुसरी काय असणार...नाही का? शाळेपासून दूर पळणारी मुले, शाळा नको म्हणून शाळेला न येणारी मुले, रडत रडत शाळेत येणारी मुले, हे चित्र सर्वांच्या परिचयाचे. सुट्टीच्या दिवशी पण शाळेत यावसं वाटते म्हणणारी मुले, फुलांच्या वर्षावाने रोज स्वागत करणारी मुले, रोज दाराच्या मागे लपून अचानक समोर येणारी मुले, आज आमचा मूड नाही काहीच शिकवू नका असे न भिता हक्काने सांगणारी मुले, थोडावेळ दिसले नाही की, शोधत शोधत रडणारा सदानंद, सुरुवातीला लवकर सुट्टी द्या म्हणणारा आता मी ६ वाजेपर्यंत बसतो, अजून थांबतो म्हणून आग्रह धरणारा प्रिंस या साऱ्या छोट्या छोट्या बाबी हृदयस्पर्शी आहेत. ही शाळेची ओढ, शिक्षकांप्रति असणारा जिव्हाळा यासाठी खरे तर विशेष काहीच करावे लागले नाही. फक्त सर्वांत आधी एकच केले शिक्षकाच्या प्रतिमेलाच धक्का दिला. (जी प्रतिमा भितीपोटी आदर व्यक्त करत होती फक्त) सर्व कृत्रिमपणा सोडून सहज, अनौपचारीक, हसत-खेळत वातावरण शाळेत व वर्गात निर्माण केले. (आज सहज, अनौपचारिक वागणे कठीण वाटते व कृत्रिम वागणे सोपे असो) वर्गात मुभा दिली टीचर, मॅडम, दीदी, ताई जे आवडेल ते म्हणा. आवडेल तिथे बसा. या सगळ्या अनौपचारिक कृतींना अजूनच न्याय दिला पथदर्शी प्रकल्पांनी.

पथदर्शी प्रकल्पांतर्गत (२०२१-२०२२) इयत्ता पहिलीची निवड झाल्यानंतर वरील गोष्टी अगदी सहज साध्य होऊ लागल्या. अनेक अध्ययन अनुभव देणाऱ्या उपक्रमांची जंत्री यात आहे. शिवाय हे उपक्रम एकविसाव्या शतकातील कौशल्ये (अध्ययन कौशल्ये - चिकित्सक विचार, सर्जनशीलता, सहकार्य, संप्रेषण. साक्षरता कौशल्ये - माहिती, माध्यम, तंत्रज्ञान. जीवनकौशल्ये- लवचिकता, नेतृत्व, पुढाकार, उत्पादकता, सामाजिक कौशल्ये.) लक्षात घेऊन सुचविलेली आहेत. त्यानुसार पाठांचे नियोजन आहेत. हे सगळे करीत असताना लवचिकता ठेवून, कल्पकता वापरून वरील कौशल्ये विकसित करण्यासाठी अनेक उपक्रमांची निवड वर्गानुरूप करण्यात आली. मागील वर्षी (२०२१-२०२२) भाज्या, फळे, फुले वापरून आकर्षक कलाकृती निर्माण करणे, हे करता करता भाज्या, फळे, फुले यांचे वर्गीकरण, दगडांचे वर्गीकरण, विविध पानाफुलांचे









वर्गीकरण हे सर्व शालेय परिसरात व घरी सहजपणे करवून घेतले. ठसेकाम यातून भेटकार्ड तयार करणे, मातीचे विविध आकार व त्यांचे प्रदर्शन, बेरीज–वजाबाकी संबोध स्पष्ट करण्यासाठी वस्तूंचा ढीग, संख्यारेषेचा वापर (प्रत्यक्ष मैदानात संख्यारेषा काढून पुढे जाणे, मागे येणे) प्रत्यक्ष मैदानावर भौमितिक आकार काढणे व पानाफुलांनी सजविणे, त्या आकारांवर चालणे, आमची धुळपाटी (प्रत्यक्ष मैदानावर) इत्यादी अध्ययन–अनुभव प्रत्यक्ष कृतींद्वारे/उपक्रमांद्वारे अगदी हसत खेळत अगदी अनौपचारीकपणे दिले. शिवाय 'कुतुहल' हा विशेष उपक्रम इयत्ता पहिलीपासून सुरू केला. यात रोज एक चित्र दाखवून त्यावर त्यांचे कुतुहल वाढविणारे प्रश्न विचारणे. उदा. सूर्याचे चित्र दाखवून उद्या सूर्यच उगवला नाही तर...? यावर्षीही दुसरीत शब्द देऊन त्यावर प्रश्न विचारणे हा उपक्रम सुरू आहे. तसेच नव्याने 'परिसरातील व्यावसायिकांची भेट व मुलाखत' हा उपक्रम इयत्ता दुसरी व पाचवीसाठी सुरू केला. साधारणतः एका महिन्यातून एका व्यावसायिकाची भेट व मुलाखत मुले प्रत्यक्ष त्यांच्या व्यावसायिक स्थळी/दुकानात जाऊन घेतात. आतापर्यंत मासे बाजार (फिश मार्केट) फळ दुकान, किराणा दुकान, कापड दुकान यांची भेट झाली आहे. याबरोबरच पाण्यावरील घोषवाक्य रंगविणे, बधाई कार्ड तयार करणे, शब्द ठोकळे वापरून वाक्य तयार करणे, शरबत, भेळ तयार करणे, बेडूक उड्या शर्यत इत्यादी कृती करवून घेतल्या. तसेच शाळा स्तरावर परीपाठातून विविध राज्यांची माहिती सांगणे हा सामूहिक विशेष उपक्रम सुरू आहे. परिपाठासाठी वर्ग पाचवी ते आठवीचे गट तयार करून प्रत्येक गटाला राज्यांची नावे दिली आहेत.







या सर्व उपक्रम व कृतींतून अध्ययन अनुभव देता देता एकविसाव्या शतकातील कौशल्ये विकसित करण्याचा प्रयत्न तर केला गेलाच, पण आणखी एक विशेष गोष्ट साध्य झाली... ती म्हणजे विद्यार्थी –शिक्षक नातेच नव्हे, तर शिक्षक–पालक यांचे नातेही आपुलकीचे, जिव्हाळ्याचे होण्यास मदत झाली. खरे तर आजची पिढी ही अत्यंत हुशार, सक्षम आहे. त्यांची विचार करण्याची गती, त्यांचे अनुभवविश्व व्यापक झाल्यामुळे मागच्या पिढीपेक्षा वाढते आहे. त्यांची आव्हाने ही वेगळी असणार आहेत. म्हणूनच अगदी कृत्रिम पद्धतीने फक्त पुस्तकी माहिती देणे कितपत योग्य ठरेल? हा विचार करणे आवश्यक आहे. म्हणून पथदर्शी प्रकल्पात विषयांचा आशय, आपल्या गरजा, आपले पर्यावरण, प्राणी, वनस्पतींचे जग व सुरक्षितता या सूत्रांभोवती गुंफुन एकविसाव्या शतकातील कौशल्ये यावर आधारीत हसत–खेळत शिक्षणावर भर दिला आहे. ही सुरुवात आणि त्यादृष्टीने आमचे प्रयत्न 'वाटचाल सृजनशीलतेकडे' करतीलच असे म्हणण्यास वावगे ठरणार नाही.




**माधुरी सेलोकर**
सहाय्यक शिक्षिका
जि. प. उच्च प्राथ. शाळा पचखेडी (गा.)
पं. स. कुही, जि. नागपूर.

◈◈◈

# गाथा विकासाची

विदर्भातील भंडारा जिल्ह्यात असलेल्या पवनी तालुक्यात वैनगंगा नदीवर बांधलेल्या (इंदिरा सागर प्रकल्प) गोसेखुर्द धरणाच्या अगदी जवळ असलेले चिचाळ हे गाव.

गावात धनगर, तेली, बौद्ध समाजाचे लोक अधिक राहतात. परिसरातील बरीच शेती गोसे प्रकल्पाच्या पाण्याखाली असल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक. साक्षरतेचे प्रमाण बऱ्यापैकी असूनही रोजगार नाही, त्यामुळे शेती आणि मेंढीपालन हा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अधिक आहे. जवळपास ९५० घरे असलेल्या चिचाळ या गावाची लोकसंख्या ३९०० च्या आसपास आहे. गावात एकाच परिसरात आमची जिल्हा परिषदेची मुलांची आणि मुलींची पहिली ते सातवी पर्यंतची उच्च प्राथमिक शाळा आणि आठवी ते बारावी पर्यंत हायस्कूल आहे. आजूबाजूच्या गावांमध्ये खाजगी शाळांचे प्रमाण अधिक आहे आणि गावात खाजगी इंग्रजी कॉन्व्हेंट आहे. इंग्रजी शाळेकडे पालकांचा ओढा जास्तच असल्याने गावातील बरीच मुले कॉन्व्हेंटमध्ये तसेच खाजगी शाळेत शिकायला जाणारी. आमच्या शाळेत मुलांनी प्रवेश का घ्यावा हे पालकांना पटवून सांगण्याकरिता आम्ही शिक्षकांनी अथक प्रयत्न केले. शाळेत विविध सहशालेय उपक्रम तसेच गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने उपक्रम घ्यायला सुरुवात केली. अतिशय सक्रिय अशी शाळा व्यवस्थापन समिती शाळेला लाभली. त्यांची मोलाची मदत शाळेला मिळाली, त्याचबरोबर ग्रामपंचायत, शाळेचे माजी विद्यार्थी यांचीही मदत मोलाची ठरली आणि बघता बघता शाळेचा चेहरा मोहराच बदलला. शाळेची पटसंख्या वाढायला लागली. खाजगी इंग्रजी शाळेतून काढून पालक आपल्या पाल्यांचा प्रवेश आमच्या शाळेत करायला लागले.



## उत्कृष्ट लोकसहभागातून शाळाविकास :

उत्कृष्ट शाळा व्यवस्थापन समिती शाळेला लाभल्याने शाळेच्या भौतिक विकासाकडे त्यांनी विशेष लक्ष घातले. शाळेला भौतिक सुविधा मिळवून देण्याकरिता ग्रामपंचायतीच्या मदतीने जिल्हा परिषदेकडे पाठपुरावा केला. शाळा डिजिटल करण्याच्या दृष्टीने शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा सदस्यांच्या मदतीने शाळेतील सातही वर्गखोल्यांमध्ये स्मार्ट टी.व्ही. लावण्यात आले. वर्गानुरूप अभ्यासक्रम त्यात आपलोड करण्यात आला. ग्रामपंचयातीकडून लॅपटॉप, प्रिंटर, मुलांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळावे म्हणून मध्यान्ह भोजनाच्या वेळी मुलांना बसण्यासाठी चटया शाळेला पुरविण्यात आल्या. लोकसहभागातून कराओके म्युझिक सिस्टम, प्रोजेक्टर घेण्यात आले. शाळेचे माजी विद्यार्थी श्री. निलेश काटेखाये यांचेकडून

शाळेला लोखंडी कपाट, बुकशेल्फ अशा प्रकारचे १५ हजार रुपयांचे साहित्य भेट देण्यात आले. शाळेचे माजी विद्यार्थी इंजिनिअर तथा सामाजिक कार्यकर्ते श्री. गणवीर साहेब नागपूर तसेच इतर माजी विद्यार्थी यांचेकडून इंटरॲक्टिव्ह बोर्ड देण्याची घोषणा करण्यात आली. आमची शाळा ही मुलांची असल्याने फक्त दारिद्र्य रेषेखालील मुलांनाच शासकीय योजनेतून गणवेश मिळतो. इतर मुले गणवेशापासून वंचित राहू नये म्हणून ग्रामपंचायतीकडून उर्वरित सर्व मुलांना दोन गणवेश प्रत्येक वर्षी दिले जातात. ग्रामपंचायत सदस्य श्री. आशिष मेश्राम यांनी कॉन्व्हेंटच्या विद्यार्थ्यांना शूज आणि नोटबुक्स त्यांच्या वाढदिवसाला भेट दिले.



**शाळेला जोडून कॉन्व्हेंट :**

शाळेची पटसंख्या वाढावी या दृष्टीने शाळा व्यवस्थापन समिती व शाळेतील शिक्षकांच्या मदतीने शाळेच्या परिसरात नर्सरी ते केजी टू पर्यंत कॉन्व्हेंट उघडण्यात आले. पालकांकडून एक हजार रुपये वर्षभराची फी आकारण्यात आली तसेच प्रति शिक्षक तीन हजार रुपये गोळा करून कॉन्व्हेंट चालविले जाते. कॉन्व्हेंटच्या विद्यार्थ्यांना दोन ड्रेस, पुस्तके आणि नोटबुक्स तसेच खेळाचे साहित्य या पैशातून विकत घेतले जाते. गावातीलच दोन उच्चशिक्षित शिक्षिकांची नियुक्ती या मुलांना शिकविण्याकरिता केली. गावात इतरही अंगणवाडी केंद्र आहेत तसेच खाजगी इंग्रजी कॉन्व्हेंट आहे. तरीही पालकांचा कल आमच्या जिल्हा परिषद शाळेच्या कॉन्व्हेंटकडेच जास्त आहे. जवळपास चाळीस विद्यार्थी आज कॉन्व्हेंटमध्ये शिक्षण घेत आहेत. त्यामुळे इयत्ता पहिलीच्या प्रवेशाचा प्रश्न सुटला. शाळेचा पट वाढण्यासाठी या कॉन्व्हेंटची मदत होत आहे.

**नावीन्यपूर्ण उपक्रमातून आनंददायी शिक्षण :**

सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देणे आणि विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास करून आदर्श नागरिक निर्माण करणे, बुद्धिमान पिढी घडविण्याबरोबरच कलागुणसंपन्न व मूल्य जपणारी पिढी तयार करणे, आधुनिक व डिजिटल शिक्षण पद्धती बरोबरच मुलांना भावनिकदृष्ट्या बुद्धिमान बनविणे, भविष्यात येणाऱ्या स्पर्धेला सक्षमपणे तोंड देऊ शकतील अशी मानसिकता विद्यार्थ्यांमध्ये तयार करणे अशी विविध उद्दिष्टे व ध्येये डोळ्यांपुढे ठेवून शाळेचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने शाळेमध्ये विविध प्रकारचे नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात.

**स्पेलिंग बी स्पर्धा :**

विद्यार्थ्यांमधील इंग्रजी विषयाची भीती दूर व्हावी, त्यांना अस्खलित इंग्रजीचं वाचन करता यावं तसेच शब्दांचे स्पेलिंग अचूक लिहिता यावे म्हणून दर आठवड्याला 'बालसभा' या उपक्रमांतर्गत 'स्पेलिंग

बी’ स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेत पहिली ते सातवी पर्यंतचे सर्व विद्यार्थी सहभाग घेतात. विद्यार्थ्यांचे चार गट केले जातात. पाच फेऱ्यांमध्ये विद्यार्थ्यांना शब्द सांगून या शब्दाचे स्पेलिंग तयार करण्यास सांगितले जाते. ज्या गटाने योग्य उत्तर दिले त्या गटास गुण दिले जातात. शेवटी सर्वाधिक गुण मिळविणारा गट



विजयी घोषित केला जातो. यात प्रत्येक फेरीचे वैशिष्ट्य हे वेगळे असते. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांचे इंग्रजी वाचन सुधारले. विद्यार्थी शब्दांचे स्पेलिंग तयार करू लागले. त्यासाठी डिक्शनरीचा वापर तसेच इंटरनेटवरून शब्दांचा शोध विद्यार्थी घेऊ लागले. विद्यार्थ्यांची शब्द संपत्ती वाढायला लागली तसेच स्पर्धेमध्ये भाग घेण्याचे प्रमाणही वाढायला लागले. विद्यार्थ्यांमधील इंग्रजी विषयाची भीती कमी व्हायला लागली.

**शालेय स्तरावर विद्यार्थ्यांचे हस्तलिखित तयार करणे :**

वाचनालयातील उपलब्ध पुस्तकांचे वाचन करून तसेच इंटरनेटवर माहितीचा शोध घेऊन विद्यार्थी लेख, कविता, गोष्टी, सुविचार संग्रह व इतर आवश्यक माहिती गोळा करतात. काही विद्यार्थी स्वतःचे लेखन करतात तसेच कविता लिहिण्याचा प्रयत्न करतात व स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून आणतात. त्यानंतर ही माहिती विशिष्ट प्रकारच्या कागदावर विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरात लिहिली जाते. आकर्षक बांधणी करून पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते केले जाते. आतापर्यंत चार हस्तलिखितांचे संपादन व प्रकाशन झेप व भरारी या नावाने झाले आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळावा व त्यांच्यातूनच साहित्यिक घडावेत असा या उपक्रमाचा हेतू आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागते. माझे लेखन पुस्तकात येणार याचा आनंदही विद्यार्थ्यांना होतो.




**स्नेहसंमेलन :**

शाळेच्या परिसरात मुलांची, मुलींची शाळा आणि हायस्कूल अशा तीन शाळा असल्याने विद्यार्थी संख्या भरपूर आहे. तिन्ही शाळांचे मिळून एकत्रितपणे स्नेहसंमेलन घेतले जाते. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांचा अविष्कार या स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून पाहायला मिळतो. विविध प्रकारच्या बौद्धिक, सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धा स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने घेतल्या जातात. तिन्ही शाळांच्या शाळा व्यवस्थापन समिती तथा माजी विद्यार्थ्यांचे उत्तम सहकार्य यावेळी शाळेला मिळते.

**स्नॅक्स मार्केट :**

विद्यार्थी घरून विविध प्रकारचे पदार्थ तयार करून आणतात. त्या पदार्थांचे शाळेत स्टॉल्स लावले जातात. विद्यार्थी आपल्या पदार्थांची योग्य किंमत ठरवितात व शाळेतील इतर विद्यार्थी त्यांच्याकडून ते पदार्थ विकत घेतात. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना खरी कमाईची अनुभूती मिळते. घरी व परिसरात पिकविलेल्या भाज्या सुद्धा विद्यार्थी स्टॉल्समध्ये मांडतात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पैशांचे व्यवहार कळतात तसेच त्यांच्या गणितीय संकल्पनाही मजबूत होतात.



**अपूर्व विज्ञान मेळावा :**

२८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिवसाच्या निमित्ताने शाळा स्तरावर अपूर्व विज्ञान मेळाव्याचे आयोजन केले जाते. या मेळाव्यात इयत्ता तिसरीपासून ते सातवी पर्यंतचे विद्यार्थी सहभागी होतात. विद्यार्थी छोटे छोटे प्रयोग सादर करतात. हे प्रयोग विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः तयार करतात त्यामुळे त्यांना विज्ञान विषयाविषयी आवड निर्माण होते. यातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टी निर्माण होते. विज्ञानाचे नियम आणि नवीन संकल्पनांची माहिती विद्यार्थ्यांना मिळते. शास्त्रज्ञांची माहिती आणि त्यांनी लावलेले शोध याविषयीची माहिती विद्यार्थ्यांना होते.

**सॅटरडे विथ फन :**

प्रत्येक शनिवार हा विद्यार्थ्यांसाठी आनंदाचा शनिवार असतो. या दिवशी विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात. विद्यार्थ्यांना खेळाच्या माध्यमातून विविध साहित्याचा वापर करून आनंददायी पद्धतीने शिकविले जाते. विविध कलेच्या आणि कार्यानुभवाच्या कार्यशाळांचे आयोजन करून विद्यार्थ्यांकडून साहित्य तयार करून घेतले जाते. संगीत, चित्रकला, शारीरिक शिक्षणाचे ताससुद्धा योग्य नियोजन करून शनिवारी घेतले जातात. त्यामुळे प्रत्येक शनिवार हा विद्यार्थ्यांसाठी आनंदाचा असतो.

**वाढदिवसाला पुस्तक भेट :**

शाळेत विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे वाढदिवस साजरे केले जातात. त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्याकडूनच शाळेला पुस्तक दान केले जाते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकांचे महत्त्व कळले. आपण शाळेला पुस्तक भेट दिली याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसतो.

**बाल सभा :**

शाळेत दर शुक्रवारी बालसभा घेतली जाते. यात विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. मराठी, इंग्रजी, हिंदी विषयांच्या कवितांचे कृतीयुक्त गायन, प्रश्नमंजुषा स्पर्धा, समयस्फूर्त

भाषण, नाट्यीकरण, नृत्य, निबंध लेखन, चित्रकला अशा प्रकारच्या स्पर्धा घेतल्या जातात. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो. या सर्व उपक्रमांचा एकत्रित परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आवड निर्माण झाली. विद्यार्थी उपस्थितीचे प्रमाण वाढायला लागले.

**आदर्श परिपाठ :**

आदर्श व सुंदर परिपाठ हा आमच्या शाळेचा आरसा आहे. प्रत्येक वर्ग नायक हा आपापल्या वर्गाच्या परिपाठाची उत्तम तयारी करून घेतो. ध्वनिक्षेपकावर सर्व बाबींचे संचलन होत असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सभाधीटपणा व भाषण देण्याची आणि डायससमोर बोलण्याची क्षमता विकसित झाल्याचे सुंदर चित्र आज आम्हाला पहायला मिळते. सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नांची उकल व पूरक ज्ञान परिपाठातच दिले जाते. बोधकथांमधून घेतलेला बोध विद्यार्थी स्वतःच्या शब्दात सांगण्याचा प्रयत्न करतात.

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग :**

शाळेतील विद्यार्थी शिष्यवृत्ती, नवोदय त्याचप्रमाणे एकलव्य स्पर्धा परीक्षा तसेच विविध संस्थांकडून आयोजित स्पर्धा परीक्षांमध्ये नेहमी सहभाग घेत असतात. त्याकरिता नियमितपणे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केले जाते. सन २०२०–२१ ला शाळेतील विद्यार्थ्यांनी शिष्यवत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये स्थान प्राप्त केले. सन २०२१–२२ लाही विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत.

शाळेबाहेरची शाळा या उपक्रमांतर्गत शाळेतील दोन विद्यार्थ्यांची मुलाखत आकाशवाणीवर घेण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने घोषित केलेल्या ४८८ शाळांमध्ये झालेली आमच्या शाळेची निवड ही शाळेसाठी आणि गावासाठी अतिशय अभिमानाची ठरली आहे. त्यामुळेच पालकांचा शाळेविषयीचा दृष्टिकोन आणखी सकारात्मक झाला. शाळेला नवीन इमारत, डिजिटल वर्ग खोली, नावीन्यपूर्ण विज्ञान प्रयोगशाळा, रोबोटिक लॅब, सुसज्ज वाचनालय इत्यादी भौतिक सुविधा प्राप्त झाल्या त्यामुळे शाळेचा दर्जा आणखीनच उंचावत आहे. भविष्यात आमची शाळा परिसरात नक्कीच नावाजलेली असेल यात दुमत नाही.

'Education is the manifestation of perfection which is already in the man'

दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळणे अत्यंत आवश्यक आहे ही बाब लक्षात घेऊन आमच्या शाळेतील सर्व शिक्षक परिणामकारक अध्यापन करून विद्यार्थ्यांच्या उपजत ज्ञानाला विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांची जोड देऊन गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे कसोशीने प्रयत्न करीत आहेत. गुणवंत विद्यार्थी घडत आहेत व शाळेची उत्तरोत्तर प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे.

कु. मंगला नत्थुजी गणवीर – सहा. शिक्षिका

**जि. प. उच्च प्राथ. शाळा चिचाळ, पं. स. पवनी, जि. भंडारा**

◈◈◈

# 'आदर्श' उपाधी खरी ठरविणारी यशस्वी वाटचाल



'पुढे पुढे यशाकडे अखंड झेप घ्यायची' हे ब्रीदवाक्य ज्यांच्या नसानसात भिनलेले असते, त्यांना यशाचे शिखर गाठण्यापासून कोणतीही अफाट शक्ती रोखू शकत नाही असे म्हणतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे आमची जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक व माध्यमिक शाळा नांदे.

सन २०१८ मध्ये ऑनलाइन बदलीने नांदे शाळेत मी पदवीधर शिक्षिका म्हणून रुजू झाले. माझ्यासह ८ शिक्षक आम्ही नव्याने रुजू झालो. सर्वांमध्ये सेवाज्येष्ठ म्हणून मुख्याध्यापक पदाचा चार्ज माझ्याकडे आला. आलेले आव्हान नव्या उर्मीने व आनंदाने स्वीकारले.

नांदे शाळेची इमारत विकसित करण्यात गावचे तत्कालीन सरपंच मा. श्री. प्रशांत रानवडे यांचा सिंहाचा वाटा आहे. तसेच इतर ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून अंदाजे २ कोटींची सर्व सुविधांनी युक्त इमारत व सुखसोयी पाहून स्वत:ला मी भाग्यवान समजले.



शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मा. सचिन डांगे व सदस्य विजय डांगे यांच्याशी बोलून शाळेची पार्श्वभूमी जाणून घेतली. सदर गावात विटभट्ट्या अनेक आहेत. ISBM कॉलेज, Symbiosis कॉलेज इत्यादीमुळे मजूर वर्गाचे सतत स्थलांतर सुरू असते. त्यामुळे आम्हां शिक्षकांपुढे खरे आव्हान गुणवत्तावाढीचे आहे, हे आम्हाला जाणवले. शिष्यवृत्ती निकालही उंचावणे हे आमच्यापुढे आव्हान होते. पहिल्याच मिटिंगमध्ये गुणवत्तेचा आलेख उंचावण्याची खुणगाठ आम्ही मनाशी बांधली व कामाला लागलो. जूनमध्येच गुणवत्तेचा पाया रचून अल्पावधीतच कळस गाठण्याचे उत्कृष्ट नियोजन केले. पालक, ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समितीचे सहकार्य मिळवत गेलो. नोव्हेंबर २०१८ मध्ये MIEB (तेजस) शाळेत निवड होण्याची लिंक मोठ्या आत्मविश्वासाने भरली. जानेवारीमध्ये निवड कमिटीने येऊन संपूर्ण कामकाज, विद्यार्थी ग्रामस्थांशी आमच्या कार्याबद्दल चर्चा इ. दिवसभर काटेकोर पाहणी केली व अखेर २६ मार्च २०१९ रोजी MIEB मध्ये शाळा निवडली गेल्याचा मेल आला. पहिले पाऊल यशस्वी ठरले.



सोबतच ग्रामस्थांच्या पुढाकाराने पुणे जिल्हा परिषदेची पहिली माध्यमिक शाळा सुरू करण्याबाबतचा शासन निर्णय ही प्राप्त झाला. पहिली ते दहावीचे संपूर्ण कामकाज एकाच छताखाली यशस्वीरीत्या सुरू झाले. सलग ३ वर्षे दहावी बोर्डाचा आमच्या शाळेचा निकाल १००% लागला. ही विशेष आनंदाची बाब आहे.

नवोदय परीक्षेत सन २०२०-२१ मध्ये मुळशी तालुक्यात एकमेव विद्यार्थिनी 'श्रावणी ससार' पात्र ठरली आणि ती विद्यार्थिनी आमच्या शाळेची आहे, याचा सार्थ अभिमान वाटला.



शिष्यवृत्ती निकालाचा आलेख दरवर्षी उंचावत गेला व यंदाच्या वर्षी ६ विद्यार्थी संभाव्य गुणवत्ता यादीत येतील अशी आशा आहे.

कोरोना काळात सर्व जग थांबले; पण आम्ही थांबलो नाही. व्हिडिओ, ऑडिओ, टेस्ट बनवून ओसरी शाळेवर रोज जाऊन गुणवत्तेचे काम अखंड सुरूच ठेवले. पालक, शाळा व्यवस्थापन समिती यांची संमती व शिक्षकांचे योगदान केंद्रप्रमुख श्री. ठकोरे सर यांची प्रेरणा व मार्गदर्शन या सर्वांचा परिपाक म्हणजे आजचे आमचे यश आहे.


गुणवत्तेसोबतच कला, क्रीडा, नाट्य यामध्येही जिल्हा स्तरापर्यंत विजयी घोडदौड केलेली आहे. प्रभारी मुख्याध्यापक म्हणून काम पाहताना माझे सर्व सहकारी, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ, वरिष्ठ अधिकारी या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. यात शंकाच नाही.


वृषाली मनोज भंडारी
**मुख्याध्यापिका**
**जि. प. आदर्श शाळा, नांदे,**
**ता. मुळशी, जि. पुणे**

# आदर्श शाळांशी संबंधित विविध शासन निर्णय

| |
|---|
| शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१४३/एसडी-६, दिनांक २६ ऑक्टोबर २०२० अन्वये, राज्यातील जिल्हा परिषद, शाळांपैकी ३०० शाळा आदर्श शाळा (Model School) म्हणून विकसित करण्यासाठी निवड. |
| शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१४३/एसडी-६, दिनांक ५ मार्च २०२१ अन्वये, पहिल्या टप्प्यात राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या ८१ शाळा, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, शासकीय विद्यानिकेतने व नागरी भागातील शाळा यांचा समावेश करून राज्यातील ४८८ शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यासाठी निवड. |
| शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.६५/एसडी-६, दिनांक १३ डिसेंबर २०२१ अन्वये, राज्यात आदर्श शाळा विकसित करणे या योजनेअंतर्गत शाळांची दुरुस्ती/पुनर्बांधणीसाठी व नवीन बांधकामासाठी रु. ४७९.४८ कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान. |
| शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २४१३(८५/१३)/अर्थसंकल्प/दिनांक २४ नोव्हेंबर २०२१ अन्वये, राज्यात आदर्श शाळा विकसित करणे नवीन लेखाशीर्ष उघडणेबाबत. |
| शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.६५/एसडी-६ दिनांक १३ डिसेंबर २०२१ अन्वये, आदर्श शाळांसाठी ४७९.४८ कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणेबाबत. |
| शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.१८४/एसडी-६ दिनांक ४ फेब्रुवारी २०२२ अन्वये राज्यातील आदर्श सल्ला म्हणून विकसित करावयाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना लहान बांधकामासाठी निधी वितरित करणेबाबत. |
| शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१४३/एसडी-६ दिनांक २२ जून २०२२ अन्वये आदर्श शाळा योजनेला ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना'' हे नाव देणेबाबत. |
| शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२२/प्र.क्र.३१/एसडी-६ दिनांक २३ जून २०२२ अन्वये राज्यातील शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने एकात्मिक व द्विभाषिक पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देणेबाबत. |

# आदर्श शाळांच्या अनुषंगाने सुरू असणारे उपक्रम







09:00